मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १५२ ■ सोमवार, ०९ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514






केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले यांनी पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी भेट घेतली. निलेश सोनावणे यांच्या कार्य अहवालाचे वाचन करीत समाधान व्यक्त केले.

( दैनिक युवक आधार )

# महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत कोण बाजी मारणार?

आज राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समिती निवडणुकांचा निकाल जाहीर होणार आहे. महापालिका निवडणुकांनंतर घसरत चाललेल्या मतदानाच्या टक्केवारीबद्दल चिंता व्यक्त होत असतानाच खेड्यापाड्यांतून म्हातारे-कोतारे, आयाबाया आणि तरुणाई मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडल्याचे



आश्वासक चित्र दिसले.

या निवडणुका छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समितींसाठी पार पडल्या. आज या सर्व निवडणुकांचा निकाल जाहीर होत आहे राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकांचा निकाल सोमवारी (९ फेब्रुवारी) जाहीर होणार असून, सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. जिल्हा परिषदेच्या ७३१ गटांसाठी व पंचायत समितीच्या १४६२ गणांसाठी एकूण ७४३८ उमेदवार रिंगणात आहेत.

आज सोमवारी (९ फेब्रुवारी) रोजी राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समिती निवडणुकांचा निकाल जाहीर होत आहे.[

# अल्पवयीन मुलीशी विवाह करणारा नवरदेव गाडीवरून फरार; नातेवाईकांसह अनेकांविरोधात गुन्हा दाखल!

**पुणे :** कपिलधार येथील मंगल कार्यालयात अल्पवयीन मुलीचं लग्न सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर पोलिसांसह सामाजिक कार्यकर्त्ये तिथं दाखल झाले. त्यावेळी विवाह सोहळा पार पडला होता. परंतु पोलीस आल्याचं पाहताच नवरदेवानं मंडपातूनच पलायन केलं. या सर्व प्रकाराचा व्हिडिओदेखील समोर आला आहे. या प्रकरणात बीड ग्रामीण पोलिसांनी वधू-वराचे आई-वडील, जवळचे नातेवाईक यांच्यासह कपिलधार देवस्थानच्या विश्वस्तांसह ७० हून लोकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तसंच पलायन केलेल्या नवरदेवाचा पोलीस शोध घेत आहेत.

**बालविवाहामुळं अल्पवयीन**



**मुलींच्या शरीरावर होतो विपरीत परिणाम :** "तीर्थक्षेत्र असलेल्या कपिलधार इथं एका अल्पवयीन मुलीचा विवाह होणार आहे, अशी माहिती आम्हाला मिळाली. यानंतर आम्ही तिथं पोहोचलो. त्यावेळी बालविवाह संपन्न झाला होता. आम्ही तिथं आलोय हे कळताच नवरदेवानं तिथून पळ काढला. तिथं असलेल्या काही नातेवाईकांना आम्ही बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात यायला सांगितलं. देवस्थान समिती आणि नातेवाईकांवर आम्ही गुन्हे दाखल केले आहेत. मुलीचं वय तपासलं ती अल्पवयीन असल्याचं समोर आलं. बीड जिल्ह्यात अल्पवयीन मुलींचे विवाह मोठ्या प्रमाणात होत असल्याचं चित्र पाहायला मिळतं. बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन सामाजिक कार्यकर्त्यांकडून जनजागृती केली जाते. मात्र अल्पवयीन मुलींचं विवाह जास्त वयाच्या मुलाबरोबर लावल्यामुळं मुलींच्या शरीरावर त्याचा विपरीत परिणाम होतो. हे नागरिकांना माहिती असूनदेखील काही लोक जाणून-बुजून असे विवाह करत आहेत," अशी प्रतिक्रिया बालहक्क कार्यकर्ता तत्वशिल कांबळे यांनी दिली.

बालविवाह थांबवण्यासाठी प्रशासनानं सामाजिक कार्यकर्त्यांसोबत काम करावं : "पाच तारखेला बीडच्या कपिलधार इथं बालविवाह संपन्न झाला. पोलीस प्रशासन आणि सामाजिक कार्यकर्त्यांना माहिती समजल्यानंतर त्यांनी तिथं ठिकाणी धाव घेतली. हा बालविवाह थांबवण्याचा प्रयत्न केला. पण, आधीच लग्न झालं होतं. मात्र, अल्पवयात मुलीचं लग्न झाल्यानंतर त्यांना संसार कसा करायचा हेही कळत नाही. आपल्यावरची जबाबदारी संपवून एखाद्या मुलीचं आयुष्य उद्धवस्त होतं, हे पालकांना कळत नाही. अल्पवयात लग्न केल्यामुळं मुलींच्या जीवाला धोका आहे.

# पनवेल तालुक्यात 70 टक्के मतदान

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समितीच्या निवडणुकीत पनवेल तालुक्यात 70 टक्के मतदान झाले. या निवडणुकीत कोण विजयी होणार आणि कोणत्या पक्षाची सत्ता येणार हे आज 9 फेब्रुवारी रोजी समजणार आहे. 7 फेब्रुवारी रोजी पनवेलमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी मतदान पार पडले. यावेळी मोठ्या प्रमाणात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सर्व ठिकाणी मतदान शांततेत पार पडले. येरमाळ या ठिकाणी पैसे वाटप करताना भरारी पथक आणि पोलिसांनी 7 फेब्रुवारी रोजी एका इसमाला पकडले. सुरेश भोईर (खिडूकपाडा) असे या इसमाचे नाव आहे. त्याच्याकडे 42 हजार 500 सापडून आले. पनवेलमध्ये झालेल्या निवडणुकीत भाजप विरुद्ध शेकाप अशी थेट लढत पाहावयास मिळत आहे. दोन्ही पक्षांनी आपापल्या उमेदवारांचा जोरदार प्रचार केला होता. आपल्याच पक्षाचे उमेदवार विजयी होतील असे दोन्ही पक्ष सांगत आहेत. मात्र 9 फेब्रुवारी रोजी कोण विजयी होणार हे समजणार आहे. पळस्पे जिल्हा परिषद गणातील कोन पंचायत समिती मध्ये सर्वाधिक 81 टक्के मतदान झाले तर सर्वात कमी मतदान पाली देवद गणातील पाली देवद पंचायत समितीत 55% मतदान झाले. एक लाख 43 हजार 724 पुरुष मतदारांपैकी एक लाख 161 पुरुष मतदारांनी मतदान केले

तर एक लाख छत्तीस हजार 32 महिलांपैकी 95 हजार 638 महिला मतदारांनी मतदान केले. 20 इतर मतदारांपैकी केवळ एका इतर मतदाराने मतदान केले. एकूण एक लाख 95 हजार 800 पुरुष, महिला मतदारांनी या निवडणुकीत मतदान केले.




# अनेक वर्षांची मागणी अखेर पूर्ण; दिल्लीतील मेट्रो स्थानकाचे नामांतर

## आता 'श्री राम मंदिर मयूर विहार' अशी नवी ओळख

**नवी दिल्ली :** पूर्व दिल्लीतील मयूर विहार पॉकेट-१ मेट्रो स्थानकाचं नाव अधिकृतपणे बदलण्यात आलं असून, आता हे स्थानक 'श्री राम मंदिर मयूर विहार' या नव्या नावाने ओळखलं जाणार आहे. शनिवारी (दि.७) अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती दिली. स्थानिक रहिवासी आणि सामाजिक संघटनांकडून अनेक वर्षांपासून




करण्यात येत असलेली ही मागणी अखेर पूर्ण झाली आहे.अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, स्थानकाच्या नामांतरासाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत. तसेच, नव्या नावाला अधिकृत मान्यता देण्यात आली आहे. पुढील काळात मेट्रो स्थानकावरील फलक, नकाशे आणि सरकारी कागदपत्रांमध्येही हे नवे नाव वापरण्यात येणार आहे.

# राजमाता जिजाऊ असे एसटीच्या नव्या बसेसचे नामकरण – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिकतेची जोड देत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच नव्या दमाच्या बसेस दाखल होत आहेत. गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ३ बाय २ आसन रचनेच्या तब्बल ५५ आसनी अत्याधुनिक बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बसेसना ' हिंदवी स्वराज्याची जननी असलेल्या *राजमाता जिजाऊ*' यांचे नाव देण्यात आले असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

या बसेस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार




असून, भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बसेस महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि अभिमानाचे जणू चालते-बोलते प्रतीक ठरणार आहेत.

**इतिहासाचा सन्मान, प्रवासात आराम**

मंत्री सरनाईक म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्या स्वराज्य संकल्पनेमागे उभी राहिलेली प्रेरणाशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ साहेब! त्या अर्थाने त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी ठरतात. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ एसटी च्या नवीन बसेसचे *राजमाता जिजाऊ* असे नामकरण केले आहे. अर्थात, एसटीने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा नावांनी बसेसना यापूर्वी गौरवले आहे. आता त्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**अधिक आसन क्षमता — प्रवाशांना मोठा दिलासा**

सध्याच्या बसेसची आसन क्षमता साधारण ४० प्रवासी इतकी असताना, नव्या बसेसमध्ये ५५ प्रवासी आरामात बसू शकतील. म्हणजेच गर्दीच्या मार्गांवर उभे राहणाऱ्या तब्बल १५ प्रवाशांना आता बसण्याची सोय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ही सेवा विशेषतः दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर सुरू करण्याचा एसटीचा मानस आहे. असे मंत्री सरनाईक म्हणाले.

**परंपरा आणि प्रगतीचा सुंदर संगम**

"राजमाता जिजाऊ" हे नाव केवळ नामकरण नाही, तर स्वराज्याच्या संस्कारांचा, मातृशक्तीच्या प्रेरणेचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठीच्या बांधिलकीचे एक सन्मानचिन्ह आहे. लवकरच इतिहासाच्या साक्षीने सजलेल्या या बसेस आधुनिक सुविधांसह महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावतील असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

# कुतूहल' विज्ञान प्रदर्शनीतून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची रुजवणूक. जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे

## पहिल्याच दिवशी 'कुतूहल' विज्ञान प्रदर्शनीला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## विज्ञान भारती व शासकीय वैद्यकीय महाविद्यालाचा संयुक्त पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/ गजानन पवार पाटील** : विज्ञानाधिष्ठित विचारसरणी ही सुदृढ समाजनिर्मितीची पायाभूत गरज आहे. 'कुतूहल' विज्ञान प्रदर्शनीसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची प्रवृत्ती, निरीक्षणशक्ती व तर्कसंगत विचार विकसित होतो. विज्ञान केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष जीवनाशी जोडले गेले पाहिजे, आणि ही प्रदर्शनी त्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे.मानवी शरीररचना, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान तसेच सीपीआरसारख्या जीवनरक्षक प्रशिक्षणाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज असून, अशा उपक्रमांमुळे आपत्कालीन परिस्थितीत नागरिक अधिक सजग व सक्षम होतील. विज्ञान भारती व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी राबविलेला हा उपक्रम समाजोपयोगी व अनुकरणीय असल्याचे प्रतिपादन जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे यांनी केले.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, विज्ञानाचे सखोल ज्ञान प्राप्त व्हावे तसेच मानवी शरीरातील विविध अवयवांची माहिती प्रत्यक्ष अनुभवातून मिळावी, या उद्देशाने विज्ञान भारती, नागपूर व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय 'कुतूहल' विज्ञान प्रदर्शनीच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला. पहिल्या दिवशी सुमारे २० ते २५ हजार विद्यार्थ्यांनी प्रदर्शनीला भेट देऊन विज्ञानाचे प्रत्यक्ष दर्शन घेतले.

विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी आयोजन समिती सदस्य पूर्वा तारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम, पद्मश्री पुरस्कार प्राप्त माजी खासदार डॉ. विकास महात्मे, वाशिम–मंगरूळपीर विधानसभा सदस्य आमदार श्याम खोडे, वाशिम नगराध्यक्ष अनिल केंदळे, उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाहक ढोबळे, वाशिम नगरपरिषद भाजपा गटनेते बाळूभाऊ मुरकुटे,



नगरसेवक गजानन लांडगे, जलसेवक सचिन कुलकर्णी, विज्ञान भारतीचे नरेंद्र सातफळे, डॉ. प्रकाश इटणकर, रोहित गणोरकर, डॉ. अनुजा मेट्रिया, डॉ. सुयोग गुर्जर, उपाध्यक्ष डॉ. हरीश बाहेती, डॉ. सरोज बाहेती, डॉ. श्रद्धा बाहेती, डॉ. हर्षाली जाधव, ॲड. भारती सोमानी, वृषाली टेकाळे, ब्रह्मकुमारी स्वाती दीदी, उद्योजक रामदास चांदवानी, शेखर बंग, प्रा. भाऊसाहेब काळे, प्रा. नारायणराव गोटे, सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी, डॉ. संजय तोष्णीवाल, लक्ष्मीबाई गोरुले नर्सिंग कॉलेजचे संचालक राजेश गोरुले, ॲड. सुरेश टेकाळे, ललित भुरे, विजय भड, अविनाश मारशेटवार, पत्रकार सुनील काकडे, इरफान भाई, माहेश्वरी संघटनेचे सचिव सुनील गट्टानी, डेंटल महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मुकुंद, भाजपा शहराध्यक्ष मनीष मंत्री, वाशिम अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

**यावेळी १०० हून अधिक स्टॉल्स, सीपीआर प्रशिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी**

प्रदर्शनीत १०० पेक्षा अधिक माहितीपूर्ण स्टॉल्स उभारण्यात आले असून मान्यवरांनी सर्व स्टॉल्सना भेट दिली.

वाशिम येथे सीपीआरचे राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने डॉ. हर्षाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्याच दिवशी ४ हजारहून अधिक विद्यार्थ्यांना सीपीआरचे प्रशिक्षण देण्यात आले.

**आरोग्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण घोषणा**

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. डॉ. विकास महात्मे यांनी 'कुतूहल' विज्ञान प्रदर्शनीच्या आयोजकांचे व संपूर्ण चमूचे अभिनंदन करत, राज्यातील हा तिसरा प्रयोग असून वाशिम येथे मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद हा संघभावनेमुळे शक्य झाल्याचे नमूद केले. तसेच जिल्ह्यात ४ हजार मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

'वाशिम जिल्ह्याचा विक्रम' — श्याम खोडे

वाशिम जिल्ह्याचा हा एक विक्रम असल्याचे नमूद केले. अशा लोकहिताच्या उपक्रमांना आपण सदैव सहकार्य करू, असे आ.खोडे यांनी सांगितले.

**नारीशक्तीचा विशेष सन्मान**

कार्यक्रमादरम्यान विज्ञान भारतीचे नेतनकर, नगराध्यक्ष अनिल केंदळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ढोबळे, अविनाश मारशेटवार, राजेश गोरुले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी नारीशक्तीचा विशेष सन्मान करण्यात आला.

**वैद्यकीय तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष दर्शन**

या विज्ञान प्रदर्शनीत विद्यार्थ्यांना मेंदू, हृदय, फुफ्फुसे, सीटी स्कॅन, एमआरआय तसेच वैद्यकीय क्षेत्रातील विविध आधुनिक यंत्रांचे प्रत्यक्ष दर्शन व माहिती देण्यात आली. सीपीआर प्रशिक्षणामुळे आकस्मिक हृदयविकाराच्या प्रसंगी प्राथमिक उपचार कसे करावेत, याचे महत्त्वपूर्ण ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त झाले. दि. ७ व ८ फेब्रुवारीपर्यंत सुरू असलेल्या या विज्ञान प्रदर्शनीचा लाभ विद्यार्थी व पालकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरीश बाहेती यांनी केले. संचालन नेहा काळे व निलेश सोमानी यांनी केले. आभार ॲड. सुरेश टेकाळे यांनी मानले.

# श्री शंकरराव चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आष्टा येथे निरोप समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर : /प्रतिनिधी सय्यद इसा :** माहूर तालुक्यातील मौजे आष्टा येथील श्री शंकरराव चव्हाण विद्यालयात दि. 07 फेब्रुवारी 2026 रोजी विद्यालयातील 12वी कला व विज्ञान च्या विध्यार्थ्यांना निरोप म्हणून निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केला होता. इ. 11 वी कला व विज्ञान चे सर्व विध्यार्थी विध्यार्थिनी व शिक्षक वृंद यांनी मिळून हा कार्यक्रम आयोजित केला असून या कार्यक्रमचे अध्यक्ष म्हणून तुकारामजी केशवे शिक्षण संस्था आष्टा चे अध्यक्ष मा. बाबारावजी केशवे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून म्हणून शंकरराव चव्हाण विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्रजी केशवे, सिंदखेड पोलीस स्टेशन चे कर्तव्यदक्ष पो.णी.मा. रमेश जाधवर साहेब, जगदंबा हायस्कुल चे प्राचार्य मा.विश्वासराव जाधव सर, निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ माहूर चे युवा आघाडी तालुकाध्यक्ष पत्रकार आदेश बेहेरे व आष्टा येथील उपसरपंच जितेश



जाधव शाळेचे पर्यव्यक्षक अशोक सोळंके सर व कोथळकर सर आदी मंचावर उपस्थित होते.

सर्वप्रथम महापुरुषयांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कु. स्नेहल राठोड, जान्हवी राठोड व चांदणी राठोड या विध्यार्थिनींणी स्वागत गीत गात उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. आणी प्रजासत्ताक दिणानिमित्त घेण्यात आलेल्या शालेय क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात प्रथम आलेल्या विध्यार्थ्यांचा व त्यांच्या चमू चे प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आले. व कु. कोमल मुंडकर, श्रुती पूलते, सलोनी राठोड, साक्षी दिवटेवाड, सिम्पल राठोड, वेदिका गवळी व कु. दुर्गेश या सर्व 12वी च्या विध्यार्थी आणी विध्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले त्यानंतर मा. बाबारावजी केशवे यांनी अध्यक्षीय भाषण करून विध्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तर प्राचार्य राजेंद्र केशवे सर यांनी आपल्या व्यक्तव्यातून बारावी नंतर काय करायचे काय नाही आणी आज पर्यंत चा शाळेतील त्यांचा प्रवास याबद्दल माहिती देत शिक्षण क्षेत्रात कुठलीही अडचण आली तरी सांगा आम्ही तुमच्या पाठीशी आहोत शाळा सोडली म्हणजे नाते सुटत नाहीत असे विध्यार्थ्यांना आश्वासन दिले. तसेच पोलीस निरीक्षक जाधवर साहेब यांनी कायदेविषयक माहिती देत दहावी व बारावी च्या अंतिम परीक्षेच्या काळात कुठलीही नक्कल चालू देणार नाही जर कोणत्या विद्यार्थ्यांचे नातेवाईक नक्कल देताना आढळयास त्याच्यावर कायदेशील कार्यवाही करू असी ताकीत देखील दिली. जगदंबा हायस्कुल चे प्राध्यापक मा. जाधव सर यांनी आपल्या भाषणातून विध्यार्थ्यांना बऱ्याच शैक्षिक बाबींचे मार्गदर्शन केले तर प्रा. तातुषा टास्के सरांनी देखील अतिशय चांगल्या प्रकारे विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संयोजक प्राध्यापिका श्रीमती कोषटवार मॅडम, प्रा. प्रशांत कदम सर असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विलास भंडारे सर यांनी केले तर मा. कोथळकर सर यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# पद्मश्री नामदेवराव ढसाळ स्मृती साहित्य संमेलन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** कुलस्वामिनी साहित्य परिषद आयोजित तिसरे विश्वसाहित्यिक पद्मश्री नामदेवराव ढसाळ स्मृती साहित्य संमेलन नामदेव ढसाळांच्या जयंतीदिनी रविवार १५ फेब्रुवारी २०२६ रोजी नीलकमल लॉन्स, पुणे-नाशिक रोड, राजगुरुनगर येथे संपन्न होणार आहे अशी माहिती संमेलनाचे निमंत्रक अशोकराव टाव्हरे यांनी प्रसिध्दिपत्रकाद्वारे दिली आहे.

ज्येष्ठ साहित्यिक व ८९ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस हे उद्घाटक असून,कनेरसर गावचे सुपुत्र, ज्येष्ठ साहित्यिक, महा. राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे माजी सदस्य कांताराम सोनवणे हे संमेलनाचे अध्यक्षपद भूषविणार आहेत.ज्येष्ठ गझलकार व साहित्यिक म.भा.चव्हाण हे परिसंवादप्रमुख असून कविसंमेलनाचे अध्यक्ष मुंबई येथील ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार अनंत धनसरे आहेत.

ज्येष्ठ विधिज्ञ व साहित्यिक प्रकाश शितोळे हे स्वागताध्यक्ष आहेत असे टाव्हरे यांनी सांगितले. साहित्य संमेलनात ग्रंथदिंडी,परिसंवाद,काव्यसंमेलन,गुणवंतांचा सन्मान याचे आयोजन केले आहे. कनेरसर येथे १५ फेब्रुवारी २०२४ रोजी पहिले व यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे १५ फेब्रुवारी २०२५ रोजी दुसरे साहित्य संमेलन झाले होते. खेड येथे नामदेवराव ढसाळ यांचा जन्म झाला असून कनेरसर येथे शालेय शिक्षण झाले होते.ढसाळ हे मुंबई येथे उपजिवीकेसाठी गेले व तीच त्यांची कर्मभूमी ठरली.साहित्य क्षेत्रात तसेच दलित पँथर च्या माध्यमातून त्यांनी अलौकिक योगदान दिले आहे.विश्वसाहित्यिक म्हणून त्यांची गणना होते.

भारत सरकारने नामदेवराव ढसाळ यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले होते.साहित्य अकादमी पुरस्कार त्यांना मिळाला होता.विद्रोही कवी- लेखक म्हणून ढसाळांची गणना होते.गोलपिठा या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाला राज्य शासनासह अनेक पुरस्कार मिळाले होते.हाडकी हाडवळा,मी मारले सुर्याच्या रथाचे सात घोडे,गांडु बगीचा,तुही यत्ता कंची, मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले, या सत्तेत जीव रमत नाही,प्रियदर्शनी, खेळ व इतर विपुल साहित्य संपदा ढसाळांनी निर्माण केली आहे. खेड तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर,साहित्यिक,साहित्य प्रेमी यांनी ढसाळांचा वारसा जतन करण्यासाठी व वाचन संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन टाव्हरे यांनी केले आहे.

# JCBच्या साह्याने सरकारी नाल्यावर अतिक्रमण; ५० वर्षांचे चिंचेचे झाड जमीनदोस्त

## रस्ता असतानाही रस्ता बंद, प्रशासन मात्र झोपेत!

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : येथील गट क्रमांक १४६ मधून जाणाऱ्या सरकारी नाला व सार्वजनिक रस्त्यावर शिवाजी कारभारी घायाळ यांनी JCBच्या साह्याने थेट हस्तक्षेप करत नाला उचलून अतिक्रमण केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या कारवाईदरम्यान कोणतीही शासकीय परवानगी नसताना सुमारे ५० वर्षांचे चिंचेचे झाड तोडून जमीनदोस्त करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सदर ठिकाणी अधिकृत सार्वजनिक रस्ता अस्तित्वात असतानाही तो पूर्णतः बंद करण्यात आल्याने ग्रामस्थांची ये-जा ठप्प झाली आहे. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी पर्यायी व लांबचा मार्ग वापरावा लागत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत



आहे.

सरकारी नाल्याची रुंदी कमी करून त्यात माती टाकण्यात आल्याने पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडविला गेला आहे. परिणामी आगामी पावसाळ्यात शेतजमिनींमध्ये पाणी साचण्याचा तसेच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे.या प्रकरणी ग्रामस्थांनी मंडळ अधिकारी यांच्याकडे लेखी अर्ज सादर

> **दोन दिवसात तलाठी व मंडळ अधिकारी जागेवरती येऊन पाहणी करून विषय मार्गी लावल्या जाईल**
> **- तहसीलदार विशाल नाईकवाडे निफाड**

केला असूनही अद्याप साधी स्थळ पाहणीसुद्धा न झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे "रस्ता असूनही रस्ता बंद आणि प्रशासन मात्र झोपेत" अशी तीव्र प्रतिक्रिया ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

या संपूर्ण प्रकाराची तातडीने चौकशी करून सरकारी नाल्यावर व सार्वजनिक रस्त्यावर केलेले अतिक्रमण त्वरित हटवावे, बेकायदेशीर झाडतोड प्रकरणी स्वतंत्र कारवाई करावी तसेच दोषींवर कठोर पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिक व शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे.

# जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी जिल्ह्यात ६९.९१ टक्के मतदान

**दैनिक युवक आधार**

**रायगड-अलिबाग** : रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका २०२६ करिता (शनिवार, दि.७ फेब्रुवारी) रोजी सकाळी ७.३० वाजल्यापासून सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली. यामध्ये जिल्ह्यात सरासरी- ६९.९१ टक्के मतदान झाले आहे.

**जिल्ह्यात तालुकानिहाय मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे**

पनवेल तालुक्यात स्त्री मतदान ९५ हजार ६३८, पुरुष मतदान १ लाख हजार १६१, इतर १ असे एकूण १ लाख ९५ हजार ८०० असून मतदानाची टक्केवारी ६९.९८ टक्के.

कर्जत तालुक्यात स्त्री मतदान ६३ हजार ९७५, पुरुष मतदान ६६ हजार ७७६ असे एकूण १ लाख ३० हजार ७५१ असून मतदानाची टक्केवारी ७६.६० टक्के.

खालापूर-तालुक्यात स्त्री मतदान ४१ हजार ९७, पुरुष मतदान ४३ हजार २०९, इतर २ असे एकूण ८४ हजार ३०८ असून मतदानाची टक्केवारी ७५.९७ टक्के.

सुधागड तालुक्यात स्त्री मतदान १७ हजार १९४, पुरुष मतदान १८ हजार ५३१ असे एकूण ३५ हजार ७२५ असून मतदानाची टक्केवारी ६६.१६ टक्के.

पेण तालुक्यात स्त्री मतदान ५१ हजार ७०, पुरुष मतदान ५४ हजार ८३ असे एकूण १ लाख ५ हजार १५३ असून मतदानाची टक्केवारी ७५.३९ टक्के.

उरण तालुक्यात स्त्री मतदान ४१ हजार ८५४, पुरुष मतदान ४१ हजार २०४, इतर १ असे एकूण ८३ हजार ५९ असून मतदानाची टक्केवारी ७६.५४ टक्के.

अलिबाग-तालुक्यात स्त्री मतदान ७४ हजार ९६९, पुरुष मतदान ७६ हजार ८१४ असे एकूण १ लाख ५१ हजार ७८३ असून मतदानाची टक्केवारी ७५.१७ टक्के.

मुरुड-तालुक्यात स्त्री मतदान २० हजार १८७, पुरुष मतदान १९ हजार ५०२ असे एकूण ३९ हजार ६८९ असून मतदानाची टक्केवारी ७१.४४ टक्के.

रोहा-तालुक्यात स्त्री मतदान ४२ हजार ३०१, पुरुष मतदान ४५ हजार ४६७ असे एकूण ८७ हजार ७६८ असून मतदानाची टक्केवारी ६८.१६ टक्के.



तळा-तालुक्यात स्त्री मतदान ८ हजार ६६, पुरुष मतदान ८ हजार ५८२ असे एकूण १६ हजार ६४८ असून मतदानाची टक्केवारी ५१.८३ टक्के.

माणगाव-तालुक्यात स्त्री मतदान ४१ हजार ८०४, पुरुष मतदान ४४ हजार २१ असे एकूण ८५ हजार ८२५ असून मतदानाची टक्केवारी ६१.५१ टक्के.

म्हसळा-तालुक्यात स्त्री मतदान ११ हजार ६२४, पुरुष मतदान १० हजार ७३४ असे एकूण २२ हजार ३५८ असून मतदानाची टक्केवारी ५१.३६ टक्के.

श्रीवर्धन-तालुक्यात स्त्री मतदान १६ हजार ७३४, पुरुष मतदान १४ हजार ८७९ असे एकूण ३१ हजार ६१३ असून मतदानाची टक्केवारी ५५.६३ टक्के.

महाड-तालुक्यात स्त्री मतदान ४५ हजार ५०८, पुरुष मतदान ४८ हजार ३६ असे एकूण ९३ हजार ५४४ असून मतदानाची टक्केवारी ६७.०८ टक्के.

पोलादपूर- तालुक्यात स्त्री मतदान ११ हजार ८८३, पुरुष मतदान १२ हजार ८९७ असे एकूण २४ हजार ७८० असून मतदानाची टक्केवारी ६३.१५ टक्के

असे जिल्ह्यात एकूण ६ लाख ४ हजार ८९६ पुरुष तर ५ लाख ८३ हजार ९०४ , इतर ४ असे एकूण ११ लाख ८८ हजार ८०४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

# महेश माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सादरीकरणाने उत्साहात पार पडले

## विद्यार्थ्यांनी नृत्य नाट्य गीतगायन आदी कार्यक्रमातून आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडवले

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे** : शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महेश माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थी गुणदर्शन शनिवारी दि.७ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडले विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलागुणांना पालक व प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. दरम्यान,चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शिवरायांची गीते, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची गीते, देशभक्तीपर गीते, पंढरीच्या पांडुरंगाचे गीते,भोले शंकर आरती, अंधश्रद्धा निर्मूलन गीत, शेतकरी नवरा हवा.. नाटिका एकसे बढकर एक गिते सादर केल्याने विद्यालयाच्या स्नेहसंमेलनात शिवशाही,भिमशक्ती,पंढरी,भोले शंकर, अवतरले होते.अंधश्रद्धा निर्मूलन,सत्य घटनेवर नाटीका सादर देशभक्ती गिताने देशभक्ती,सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले सादर केलेल्या विविध कलाविष्काराने उपस्थितांच्या डोळ्याचे पारणे फेडले. मुलांची कला पाहून पालक भारावून गेले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष युवा नेते अभयराजे धोंडे हे होते.पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर दिवंगत उपमुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.शाळेच्या वतीने अध्यक्ष युवा नेते अजय दादा धोंडे, यांच्यासह कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती नामदेव धोंडे, माजी सरपंच संजय नालकोल,प्रशासकीय अधिकारी प्रा.संदीप ननवरे,आजिनाथ नालकोल, माजी उपसरपंच अनिल गजघाट,महादेव खोडके,हरी खोडके आजिनाथ कन्हेरकर, मनोज बनसोडे,वैजनाथ काळे,दादा



नालकोल,मान्यवरांचा सत्कार करुन कार्यक्रमाला आलेल्या सर्वांचे स्वागत करण्यात आले.शाळेचे प्राचार्य यु.एस. भुकन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले यावेळी ५ वी वर्गापासून ते १२ पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या स्नेहसंमेलनात सहभाग घेतला होता. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्ती परगीत,सामाजिक व विनोदी नाटिकांसह विद्यार्थीदशेत होणारे मोबाइलचे दुष्परिणाम या विषयावर नाटिका सादर,उखाणे,कोळीनृत्य, गरबा, लावणी, गोंधळ, ओवी, शेतकरी, असे विविध नृत्य सादर करून सांस्कृतिक मूल्यांची देवाण-घेवाण केली.विद्यार्थांनी हुबेहूब देखावे सादर केले तर देशभक्तीपर गीताने प्रेक्षकांचे आश्रू अनावर झाले, विद्यार्थ्यांनी अनेक कलाविष्कारांनी गाणे सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.. गाण्यावर पालकांसह उपस्थितांनी दाद दिली कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी केलेली वेशभुषा रशिकांचे लक्ष वेधून घेत होती.ग्रामस्थ व प्रेक्षकांनी तसेच पालकांनी विद्यार्थ्यांना भरघोस बक्षिसे देत त्यांचे मनोबल वाढवले विद्यार्थी आणि शिक्षकवर्गाने संमलेनात रंगत आणली. या संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना शाळेच्या शिक्षकांची होती.प्राचार्य यु.एस.भुकन त्यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील सूनेहसंमेलन यशस्वी झाले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य यु.एस.भुकन,एस.जी. विधाते,एस. यु.तोडकर,जी.एम. परदेशी,बी.एल.कोकरे, डी.जी.शेलार,एस.डी.एकशिंगे,प्रा. एम.व्ही.बोडखे,पी.एम.गांजुरे,अर्चना बोडखे गिलचे मॅडम,हजारे सर,सतिष वाघुले,डी.ए.धोंडे,पी.एस.नालकोल, एस एस बोडखे,एम. व्ही.बोडखे,एस. टी.खिलारे, महेश गायकवाड,अमोल धोंडे,टी.ए. मासाळकर,अशोक गांजुरे,भारत नालकोल आदींनी अविरत परिश्रम घेतले या कार्यक्रमासाठी उपसभापती,आजी - माजी सरपंच, उपसरपंच ,ग्रा.पं सदस्य, चेअरमन, तसेच रुईनालकोल,नांदा,फत्तेवडगांव,सराटेवडगांव, आनंदवाडी, टाकळी अमिया परिसरातील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन पी.एम.गांजुरे,सतिश वाघुले यांनी केले तर आभार प्राचार्य यु.एस.भुकन यांनी मानले कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने झाली

---

# खोट्या 'पोलिस' नेमप्लेटने ट्रॅफिक दहशत, फसवणूक!

### रेवदंडा-अलिबाग- वडखळ रस्त्यावर दमदाटी, गाडी मालकीची चौकशी का नाही?

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : रेवदंडा, अलिबाग ते पेझारी, पोयनाड, वडखळ या गर्दीच्या मार्गावर 'पोलिस', 'महाराष्ट्र शासन' नेमप्लेट लावलेल्या चारचाकी आणि मोटारसायकल गाड्या ट्रॅफिक जाम करून दमदाटी करताना दिसत आहेत. ही गाड्या खरंच पोलिस किंवा सरकारी कर्मचाऱ्यांच्या आहेत का? की खोट्या नेमप्लेटने फसवणूक आणि नियम मोडले जात आहेत? 'पोलिस/महाराष्ट्र शासन प्लेट असलेली गाडी त्या अधिकारी-कर्मचाऱ्याच्या नावावर नोंद आहे का? की खोट्या प्लेटने गैरफायदा घेतला जातोय?', असा सवाल जनता करत आहे.प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, या गाड्या आधे





मधे घुसवून ट्रॅफिक रोखतात आणि चालकांची उद्धट, अरेरावी भाषा, धमक्या देतात. RTO उपप्रादेशिक कार्यालय, वाहतूक शाखा रायगडचे अधिकारी या गाड्यांची मालकी तपासून चौकशी का करत नाहीत? खोट्या नेमप्लेटने महाराष्ट्र शासनाची फसवणूक केल्याबद्दल कायदेशीर

> "खोट्या 'पोलिस/महाराष्ट्र शासन' नेमप्लेटचा गैरवापर गंभीर बाब आहे. मोटार व्हेईकल कायद्यांतर्गत गाडी मालकीची तपासणी आणि चौकशी आवश्यक. RTO व पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, जेणेकरून जनतेचा विश्वास राखला जाईल
>
> अँड विनोद नाईक
> सामाजिक कार्यकर्ते

गुन्हा दाखल करावा, अशी जनतेची मागणी आहे. नियम तोडणाऱ्यांवर कारवाई टाळल्याने पोलिसांच्या प्रतिमेला धक्का बसत आहे. नवी मुंबईत धक्कादायक उदाहरण: मद्यधुंद इनोव्हा ने धडक, खोटी प्लेट का?काल, ७ फेब्रुवारीला नवी मुंबईत इनोव्हा कारने अनेक वाहनांना धडक दिली. कारवर 'पोलिस' नेमप्लेट आणि मुंबई पोलिस वरिष्ठ निरीक्षक अरुण बबन पोखरकर यांचे ओळखपत्र आढळले. ही गाडी खरंच त्या अधिकाऱ्याच्या नावावर आहे का? मद्यधुंद चालकाचा गैरफायदा घेतला गेलाय का? पोलीस तपास करत आहेत, पण जनता म्हणते – सर्व 'सरकारी प्लेट' गाड्यांची मालकी तपासा!राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद वसंत दाते यांनी तातडीने दखल घेऊन, खोट्या नेमप्लेटवरील गाड्या जप्त करा, मालकी चौकशी करा आणि फसवणुकीसाठी कठोर कारवाई करा, अन्यथा जनआंदोलन उभे राहील!

---

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेंडका येथे त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी/प्रकाश गवारे** : त्याग, संघर्ष आणि मातृत्वाचे प्रतीक असलेल्या कोट्यवधी लेकरांची आई त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मेंडका येथे अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास शालेय शिक्षण समितीचे कार्यकारिणी सदस्य, विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.कार्यक्रमाची सुरुवात माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी माता रमाई आंबेडकर यांच्या त्यागमय, कष्टमय व संघर्षशील जीवनकार्यावर सखोल मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनात माता रमाई यांचे योगदान अतुलनीय असून त्यांनी संपूर्ण आयुष्य कुटुंब, समाज आणि



राष्ट्रासाठी समर्पित केले, असे मत वक्त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भाषणे, कविता आणि प्रेरणादायी विचार सादर करून माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनातील आदर्श मूल्ये प्रभावीपणे मांडली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमास विशेष रंगत आली. शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांना माता रमाई आंबेडकर यांच्या विचारांचा अंगीकार करून शिक्षण, शिस्त व सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. या प्रसंगी शालेय शिक्षण समिती सदस्यांनी शाळेतील शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत अशा प्रेरणादायी कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, आत्मभान व सामाजिक जाणीव वृद्धिंगत होते, असे मत व्यक्त केले. पालकांनीही या उपक्रमाचे स्वागत करून शाळेच्या प्रयत्नांचे अभिनंदन केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवर्ग, शालेय व्यवस्थापन समिती तसेच विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

---

# श्रीवर्धन तालुक्यात मतदानाला मर्यादित प्रतिसाद; नाराजीचा निवडणूक निकालावर प्रभाव

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी श्रीवर्धन तालुक्यात मतदान प्रक्रिया पार पडली असली, तरी मतदारांचा अपेक्षित उत्साह मात्र दिसून आला नाही. एकूण ३१,६१३ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ५५.६३% इतकी नोंदवली गेली आहे. विशेष म्हणजे सुमारे ४५% मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवली, ही बाब राजकीय पक्षांसाठी चिंतेची ठरली आहे.

तालुक्यातील मतदानात पुरुष मतदार १४,८७९ तर महिला मतदार १६,७३४ इतके सहभागी झाले. या निवडणुकीत जिल्हा परिषदेच्या दोन आणि पंचायत समितीच्या चार जागांसाठी मतदान झाले.

राजकीय विश्लेषकांच्या मते, मतदानात झालेली घट ही केवळ उदासीनतेमुळे नसून स्थानिक नेत्यांबाबतची नाराजी, उमेदवार निवडीबद्दल असमाधान, निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलल्याची भावना तसेच दिलेल्या आश्वासनांची अपूर्ण अंमलबजावणी या कारणांमुळे मतदारांनी मतदानापासून दूर राहणे पसंत केल्याचे चित्र दिसून येत आहे.विशेषतः ग्रामीण भागात "कोणासाठी आणि का मतदान करायचे?" असा प्रश्न मतदारांमध्ये निर्माण झाल्याचे बोलले जात असून, याचा थेट परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर झाल्याचे स्पष्ट होत आहे. काही ठिकाणी शांत वातावरणात मतदान पार पडले असले, तरी आतल्या नाराजीचा आवाज मतदान आकडेवारीतून स्पष्टपणे जाणवत आहे.

आगामी काळात राजकीय पक्षांनी आत्मपरीक्षण करून मतदारांशी थेट संवाद, विश्वासार्ह उमेदवारांची निवड आणि आश्वासनांची पूर्तता यावर भर न दिल्यास, अशीच परिस्थिती पुढील निवडणुकांतही कायम राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

---

# परतूर शहरात माता रमाई जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)** : शनिवार दिनांक 7 फेब्रुवारी रोजी त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची 128 वी जयंती परतूर शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.सकाळी १० वाजता तहसील कार्यालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागेवर पंचशील ध्वजाचे ध्वजारोहन नगराध्यक्षा प्रियंका राक्षे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात, उपनगराध्यक्षा विशाखा राखे,माजी नगरसेवक गणेश पवार, अखिल काजी,नगरसेवक कदीर कुरेशी,हृषीकेश कराळे, नगरसेविका माधवी संतोष पवार, वंचितचे नेते गौतम खंडागळे, वंचितचे शहराध्यक्ष राहुल नाटकर, पत्रकार अर्जुन पाडेवार, गुलाब दंवडे, संतोष पवार, सिद्धार्थ बंड,प्रदिप साळवे, पत्रकार अशोक ठोके, पत्रकार राज भदर्गे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.जयंती



उत्सव समितीच्या वतीने अध्यक्ष करण पाडेवार,सचिव प्रदीप पहाडे, उपाध्यक्ष धम्मपाल खंडागळे, कोषाध्यक्ष रोहन अंभोरे, तुषार पाडेवार,स्वप्निल पहाडे, यांनी अभिवादन केले.

माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक सायंकाळी 6 वाजता उपविभागीय पोलिस अधिकारी रामेश्वर रेंगे, नगराध्यक्षा प्रियंका राक्षे, पोलीस निरीक्षक सुदाम भागवत,अर्जुन पाडेवार,दया काटे,शहाजी राक्षे, बालाजी ढोबळे, प्रभाकर प्रधान,अशिष धुमाळ,अशोक ठोके,सतिष सोनवने,संतोष पवार,सतिष वाहुळे , सचिन वाहुळे, योगी प्रधान,हेंमत पहाडे, झुंगाराम साळवे, सुनिल खंदारे, विकास वेडेकर, सोना पाडेवार, अंकुश पाडेवार, दिपक मुंढे, योगी प्रधान,रवि इंगळे,व्हॉईस ऑफ मीडियाचे परतूर तालुका अध्यक्ष भाऊसाहेब मुके,रशिद बागवान,संतोष कारके, अशोक दवंडे, शिवा साळवे,यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून संविधान चौक रेल्वे स्टेशन येथून रथातून काढण्यात आली. या मिरवणुकीत बौद्ध उपासक- उपासिका यांची मोठ्या संखेने उपस्थिती होती. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या घोषणांनी परतूर शहर दणाणून गेले होते.हि भव्य मिरवणूक रेल्वे स्टेशनमार्गे, महादेव मंदिर चौक, तहसील कार्यालय चौक, पोलीस स्टेशन चौक,मलंगशहा चौक,भाजी मंडई तसेच देशपांडे गल्ली मार्गे आंबेडकर नगर येथे मिरवणुकीचा समारोप पोलीस निरीक्षक भागवत व संजना पाडेवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व बौद्धाचार्य हेमंत पहाडे यांच्या सह सर्व उपासक, ऊपासिका यांनी सामुहिक बौद्ध वंदना घेऊन करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष करण पाडेवार,सचिव प्रदीप पहाडे , उपाध्यक्ष धम्मपाल खंडागळे,कोषाध्यक्ष रोहन अंभुरे यांच्यासह स्वप्निल पहाडे ,प्रशांत वाकळे ,प्रवीण प्रधान,सनी गायकवाड, अविनाश पाडेवार,आकाश राक्षे,अजय पाडेवार,दिपक हिवाळे,बाळा पाडेवार,विकास वेडेकर ,सिद्धार्थ खंडागळे ,कुमार लांडगे,संतोष साळवे,सुनिल पाडेवार,मनोज वंजारे, हेमंत पहाडे,संघम पाडेवार,वंजारे, दिलीप साळवे,उत्तम घुगे,रुपेश पहाडे विकास पहाडे,विशाल सोनपसारे यांनी अथक परिश्रम केले. शहरात नगरसेवक सज्जाद भाई नाईकवाडी,अंकुश तेलगड,आखील काजी यांनी पिण्याच्या पाण्यासह लिंबू शरबत उपस्थित भिम सैनिकांसाठी ठेवले होते.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे, पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांनी मिरवणूक मार्गावर चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.दुर्गावाड यांनी मिरवणुकीच्या अनुषंगाने ॲम्ब्युलन्स,अग्निशामक गाडी दिली होती.

---

# ₹भाळवणी (नाईकाची)ता. तालुका पंढरपूर या ठिकाणी लक्ष्मण शक्ती मुक्तिमहोत्सवचा कार्यक्रम₹

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर)** :-जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या पंढरपूर तालुक्यातील शाकंभरी मातेच्या व रेणुका माता यल्लमा माता,सिद्धनाथ आणि सर्व परमेश्वरांच्या व सर्वांच्या भाळवणी (नायकाची) नगरीमध्ये अतिशय भक्ती भावाने "रामायण" ग्रंथाचे वाचन गेली अनेक दिवसापासून सुरू असून या ठिकाणी अनेक ठिकाणाहून सूचक वाचक भक्ती भावाने येऊन सेवा बजावत असून श्रोते वर्गांचाही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद आहे. रामायणातील लक्ष्मण "शक्ती- मुक्ती महोत्सव"या





कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्रीराम वनवासी दिंडीचे आयोजन सर्व रामभक्त व सर्वांच्या सहकार्याने करून ही श्रीराम वनवासिक दिंडी भाळवणी येथून अतिशय भक्तिमय वातावरणात श्रीराम जय राम जय जय राम जय जय घोषामध्ये सज्जनगड-देहू -आळंदी-भीमाशंकर- त्र्यंबकेश्वर- वणी- वेरावळ(सोरटी सोमनाथ)-गिरनार- द्वारका -नागेश्वर -पुष्कर-अमृतसर -वाघाबॉर्डर- कटरा ( वैष्णोदेवी) -शिव कोडी- हरिद्वार- ऋषिकेश- मथुरा -वृंदावन- गोवर्धन- अयोध्या -वाराणसी -काशी -प्रयागराज- चित्रकूट- जबलपूर -उज्जैन -ओंकारेश्वर- घृणेश्वर- मुक्ताईनगर-मांडकी- पंढरपूर अशा तीर्थक्षेत्रांचे दर्शन करून भाळवणी या ठिकाणी श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती कार्यक्रमाला श्रीराम वनवासिक दिंडीचे आगमन भाळवणी येथे कार्यक्रम स्थळी आगमन होणार आहे. या कार्यक्रमाची भाळवणी येथील सर्व ग्रामस्थ व रामभक्तांकडून जय्यत तयारी सुरू असून दिनांक रोजी भव्य व दिव्य असा श्री हनुमान मंदिराच्या प्राणांगणात श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती महोत्सवाचा कार्यक्रम होणार असल्याचे संयोजकांनी सांगितले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# त्यागमूर्ती रमाबाई भीमराव आंबेडकर जयंती जन्मोत्सव सोयगाव येथे उत्साहात साजरा



**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे** : येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर येथे त्यागमूर्ती रमाबाई भीमराव आंबेडकर जयंती जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस सोलापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,

रिपब्लिकन सेना सोयगाव तालुका अध्यक्ष अंकूश पगारे,समाजसेवक रवी काळे,जाधव सर,भरत पगारे,भैय्या जुनघरे,पोलीस कॉन्स्टेबल तडवी,अजय कोळी,याच्यी उपस्थित होते. मान्यवरांनी त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या संघर्षमय जीवनातून समाजाला मिळालेल्या प्रेरणेची माहिती दिली. रमाबाई आंबेडकर यांनी बाबासाहेबांच्या कार्याला दिलेले मोलाचे योगदान आणि त्यांच्या त्यागाची आठवण यावेळी उपस्थितांना करून देण्यात आली.

कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते, युवक, महिला, विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम शांततामय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.शेवटी अंकूश पगारे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# महाराष्ट्राचा 'आधुनिक बालगंधर्व' आशिमिक कामटे! २० हून अधिक मानाच्या पुरस्काराने सन्मान!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी** : लावणीचा वारसा अन बालगंधर्वांचा आदर्श! लावणी सम्राट आशिमिक कामटे यांच्या कलेचा डंका सातासमुद्रा पार ; 'नवी मुंबई भूषण'सह डझनभर पुरस्कारानाही शाही सन्मान. महाराष्ट्राच्या मातीतील अस्सल लोककला ' लावणी' केवळ जिवंत न ठेवता तिला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून देणारे, सुप्रसिद्ध 'लावणी सम्राट 'आशिमिक कामटे सध्या त्यांच्या कलेच्या सुवर्णकाळात आहेत. त्यांच्या या कलाक्षेत्राची सुरुवात श्रीहरी पोवळे सर यांच्या कडून प्रेरणा घेऊन झाली.बालगंधर्वांचा वारसा समर्थपणे पुढे नेणाऱ्या अशिमिक त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची आणि कलेची दखल घेत त्यांना अनेक मानाच्या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

प्रसिद्ध दिग्दर्शक अशोक हांडे आणि सुभाष नकाशे यांच्या 'मराठी बाणा' आणि 'माय मराठीच्या लेकी' या जगप्रसिद्ध कार्यक्रमात आशिमिक कामटे यांनी सलग १० वर्षे मुख्य नर्तक म्हणून काम केले आहे .या माध्यमातून त्यांनी अनेक



विदेश दौरे करून महाराष्ट्राची संस्कृती सातासमुद्रापार पोहोचवली. बालगंधर्व प्रमाणे स्त्री भूमिका आणि लावणीचे सर्व प्रकार लिलया सादर करण्यात त्यांचा हातखंडा असून ,त्यांच्या आदाकारीची दखल अनेक राष्ट्रीय वृत्तपत्रांनी घेतली आहे

२०२१ 'नवी मुंबई भूषण' आणि 'लावणी सम्राट' पुरस्कार, श्री बालगंधर्व पुरस्कार व एकलव्य पुरस्कार, डी वाय पाटील युनिव्हर्सिटी कडून विशेष कलाकार पुरस्कार, न्यू आर्ट्स कॉलेज अहमदनगर तर्फे विशेष अतिथी मान्यवर पुरस्कार, ग्रामविकास प्रतिष्ठान खेड तर्फे महाराष्ट्र ग्राम विकास विशेष पुरस्कार ,मुक्ती फाउंडेशन २०२३ विशेष सांस्कृतिक पुरस्कार, ऑल इंडिया रेडिओ गार्डन २०२३तर्फे उत्कृष्ट नर्तक सन्मान, नारायणगावकर परिवाराकडून बैठकीची व विराहाची लावणी सादर केल्याबद्दल विशेष गौरव, पाककलेपासून ते नृत्य दिग्दर्शन पर्यंतचा त्यांचा प्रवास केवळ रंगमंचच नाही तर आशिमिक कामटे यांनी 'आधारवड' या मराठी चित्रपटात राखी सावंत यांच्या लावणीचे नृत्य दिग्दर्शन केले आहे. 'चला हवा येऊ द्या' मधील कलाकारांची पारंपरिक वेशभूषा आणि डिझाइन्स ते स्वतः करतात. सानपाडा येथे त्यांचे नृत्याचे क्लासेस सुरू असून, अनेक मोठ्या शाळांच्या वार्षिक स्नेहसंमेलनात ते नृत्याचे प्रशिक्षण देतात .दुबईत झालेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत त्यांनी परीक्षक म्हणून मोलाची भूमिका बजावली आहे.

'वारसा माझ्या कलेचा', 'अदाकारी लावणीची'आणि 'गजर संस्कृतीचा' यासारख्या स्वतःच्या लोककनृत्य कार्यक्रमातून त्यांनी अस्सल लावणीचा ठसा उमटवला आहे. भूषण कोरगावकर प्रस्तुत 'संगम वारी' आणि 'लावण्य दरबार' मधील त्यांच्या उर्वशी व घुंगरू या विशेष भूमिका गाजल्या आहेत.

रंगमंचावरच्या झगमगाटात हजारो टाळ्यांच्या कडकडाटात जेव्हा आशिमिक उभा राहतो, तेव्हा त्या घुंगरांच्या आवाजात केवळ ताल नसतो तर तो असतो एका कलाकाराने कलेसाठी वाहिलेला 'श्वास' बालगंधर्व प्रमाणे स्त्री सुलभ नजाकत आणि पुरुषाची जिद्द यांचा मेळ घालत अशिमिक यांनी लावणीचा सन्मान वाढवला .आयुष्याच्या वळणावर अनेक चढउतार आले पण नृत्य हाच 'धर्म 'आणि लावणी हेच' दैवत' म्हणून ते आजही घराघरात मराठी बाणा जपत आहेत केवळ पुरस्कार मिळवणे हे त्यांचे ध्येय नाही तर लुप्त होत चाललेली आपली संस्कृती पुन्हा नव्याने उभी करणे ही त्यांची धडपड आहे. आशिमिक त्यांच्या घुंगराची हि 'साद' येणाऱ्या अनेक पिढ्यांना सांगत राहील की कलावंत मरत नाही तर तो त्याच्या कलेच्या वारशातून युगानयुगे जिवंत राहतो.

# अकोली जहागीर येथे श्री संत गजानन महाराज प्रगट दिन उत्साहात संपन्न!!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे अकोट प्रतिनिधी :** अकोली जहागीर (ता. अकोट, जि. अकोला) येथे संत श्री गजानन महाराजांचा प्रकट दिन (माघ वद्य सप्तमी) अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा झाला या पवित्र स्थळी, जिथे महाराजांनी पदस्पर्श केला होता, तिथे भक्तांनी गर्दी करत विशेष पूजा, अभिषेक आणि भजन-कीर्तनाचा आनंद घेतला.

अकोली गावाचे महत्व:-

श्री गजानन महाराजांनी आपल्या योग सामर्थ्याने श्री भास्कर पाटील जायले (श्रींचे पट्टशिष्य श्री भास्कर महाराज ) यांच्या आकोली जहागीर येथील शेत सर्व्हे नं .५२ मधील कोरडी विहीर सजल केली . तेव्हा श्रींचे चरण या अकोली जहागीर गावाला लागले.



या विषयीचे वर्णन संतकवी दासगणू महाराज विरचित 'श्री गजानन विजय 'ग्रंथाच्या ५ व्या अध्यायात आलेले आहे ते याप्रमाणे माध्यान्हीच्या समयाला । अकोली गावापासी आला । हा योगयोगेश्वर साधु भला । श्री गजानन महाराज ॥८६॥त्या अकोलीच्या शिवारांत । जलाचे दुर्भिक्ष अत्यंत ।एक वेळा मिळेल घृत । परि अभाव पाण्याचा ॥९२॥देवा ही आकोली ।पाण्यांवाचून त्रस्त झाली । वोलही न राहिली ।कोठेच देवा विहिरींतून ॥ ११७॥ तसेच श्री गजानन महाराज आकोलीला श्री भास्कर महाराज यांचा उद्धार करण्यासाठी व त्यांना आपले पट्टशिष्य करून घेण्यासाठीच आले होते .तसेच श्री गजानन प्रार्थना स्तोत्रात आकोलीच्या रानात । सर्व्हे नंबर बावन्नात । एका शुष्क गर्दाडाप्रत । तुम्ही बनविली पुष्करीणी ॥८३॥श्रींनी आकोली जहागीर येथील शेत सर्व्हे नं .५२ ची विहीर सजल केली असे स्पष्ट वर्णन आहे .येथे श्री गजानन महाराज व पट्टशिष्य श्री भास्कर महाराज यांचे भव्य मंदिर सुद्धा आहे .

उत्सव स्वरूप : अकोली जहागीर श्री गजानन महाराज शेगाव संस्थान (शाखा आकोली) येथे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात .भक्तीमय वातावरणात प्रकट दिनानिमित्त गावकऱ्यांनी आणि भाविकांनी एकत्र येत महाराजांच्या लीलांचे स्मरण केले.प्रकट दिन शेगावसह संपूर्ण विदर्भात, विशेषतः अकोली जहागीरमध्ये हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो या पवित्र भूमीत दर्शनार्थ आणि श्री चा महाप्रसादा चा लाभ घेण्यासाठी असंख्य भाविक सहभागी झाले होते.

# इंग्रजी भाषा ही रोजगार निर्मितीचे साधन ! :-प्रा.डॉ.मनोजकुमार नवसे

## जयभवानीत "इंग्रजी भाषेतील रोजगार क्षमता कौशल्य" या विषयावर व्याख्यान

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** इंग्रजी भाषा ही जागतिकीकरणात रोजगार निर्मितीचे प्रमुख साधन आहे! असे प्रतिपादन बंकटस्वामी महाविद्यालय, बीड येथील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.मनोजकुमार नवसे यांनी केले. ते इंग्रजी विभाग आयोजित "इंग्रजी भाषेतील रोजगार क्षमता वाढीसाठी आवश्यक कौशल्य " या विषयावरील व्याख्यानात व्याख्येते म्हणुन बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. ती जगात बोलली जाते. म्हणुन जगभरात रोजगार मिळण्यासाठी सर्वांना इंग्रजी भाषा बोलता आली पाहिजे,अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर हे



होते. तर व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक तथा इंग्रजी विभागाचे प्रा.विनोद किर्दक, प्रा.डॉ.सुनिल जाधव, प्रा.डॉ.वंदन जाधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.विनोद किर्दक यांनी केले. तर सुत्रसंचलन प्रा. डॉ.जाहेद सिध्दीकी यांनी केले. शेवटी आभार प्रा.डॉ.वंदन जाधव यांनी मानले. या प्रसंगी इंग्रजी विषयाचे बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# कालिकादेवी महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार प्रतिनिधी** : येथील कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने दिनांक ९ फेब्रुवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले आहे. या संमेलनाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे हे आहेत. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सिद्धेश्वर संस्थानचे मठाधिपती ह. भ. प. श्री विवेकानंद शास्त्री महाराज यांच्या हस्ते होणार आहे.

या वार्षिक स्नेहसंमेलनास प्रमुख मार्गदर्शक म्हणून कवी लेखक साहित्यिक डॉ. समाधान इंगळे अट्टल महाविद्यालय गेवराई हे उपस्थित राहणार आहेत. वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त महाविद्यालयामध्ये दिनांक ५ फेब्रुवारी रोजी आनंदनगरीचे बलून गेम, कप गेमचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक ६ फेब्रुवारी रोजी संगीत खुर्चीचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक सात फेब्रुवारी रोजी फॅन्सी ड्रेस व अंताक्षरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषक विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्र दिले जाणार आहेत. या वार्षिक स्नेहसंमेलनास शिरूर नगरीतील प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार बंधू व माजी आजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे यांनी केले आहे.

# बिबी येथे संत गजानन महाराजांचा प्रकट दिन सोहळा उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**बीबी: वार्ताहर** : येथे श्री संत गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त गजानन महाराज सांस्कृतिक आश्रम बहुउद्देशीय संस्था येथे ६ फेब्रुवारी पासुन उत्साहास सुरुवात झाला. ८ फेब्रुवारीला महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली,

बीबी येथे सालाबादप्रमाणे याहीवर्षी संत गजानन महाराज प्रगट दिन सोहळा गुरुवर्य संत हभप रंगनाथ बाबा यांच्या आशीर्वादाने व ग्रामस्थांच्या सहकार्याने साजरा करण्यात आला. यानिमित्त दररोज नामवंताचे प्रवचन, कीर्तन, भारुड, राष्ट्रीय एकात्मता, व्यसनमुक्ती जनजागृती, देश वाचवा लेक वाचवा' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संत गजानन महाराज मंदिरात होमहवनयज्ञ मूर्ती अभिषेक करण्यात आला

**प्रकटदिनानिमित्त कीर्तन**

काकडा भजन, हरिपाठ, गजानन विजय ग्रंथाचे पारायण साठी ९१ महिला व पुरुष यांनी सहभाग घेतला होता , व गजानन महाराज चरित्र व सायंकाळी नामवंत महाराजांचे हरिकीर्तन होत . ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता गजानन महाराजांच्या प्रतिमेची रथातून नगरप्रदक्षिणा वारकऱ्यांच्या



टाळ मृदंगाच्या गजरात काढण्यात आले व नगरप्रदक्षिणेमध्ये माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे साहेब नगरप्रदक्षणेत वारकऱ्यांसोबत भजन व फुगडी खेळून आनंद घेतला नगर प्रदक्षिणेमध्ये हजारो वारकऱ्यांच्या संख्येने नगर प्रदक्षिणा काढण्यात आली. यावेळी रथ पालखीचे पूजन ठाणेदार चंद्रकांत पाटील साहेब व अभयदादा चव्हाण सभापती राजु इंगळे बबन बनकर चंद्रकला गुलमोहर संदीप चव्हाण बबलू आटोळे सागर बनकर शाहीर चव्हाण शकुआप्पा बनकर राजु मुंढे दिलीप फडके यांनी केले.व नंतर काल्याचे कीर्तन सारंगधर महाराज टेके यांनी केले. त्यानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी भाविक भक्त, महिला, पुरुष, बाळ गोपाळ यांनी हजारोच्या संख्येने महाप्रसादाचा आस्वाद घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थान विश्वस्त सारंगधर महाराज टेके रमेश कुरंगळ गोविंद टेके गोपाल महाराज टेके वैभव आंधळे गोटु आवगळे रमेश उबाळे समाधान नरवडे व समस्त गावकरी मंडळी बिबी व परिसरातील भाविक भक्तांच्या सहकार्याने संपन्न झाले

# अवैध हातभट्टीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई; ५ गुन्हे दाखल; ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**

**ग्रामीण जिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील** : दि.६ फेब्रुवारी (जिमाका) अवैध हातभट्टी निर्मिती, विक्री व वाहतुकीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने वाशिम तालुक्यात मोठी धडक कारवाई केली आहे. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच अमरावती विभागाचे विभागीय उप आयुक्त डॉ. पराग नवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई राबविण्यात आली.

दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी वाशिम तालुक्यातील मोहगव्हाण शेतशिवारातील धरणाच्या काठी अवैध हातभट्टीविरोधात सामूहिक मोहीम राबविण्यात आली. या



मोहिमेत विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. कारवाईदरम्यान अवैधरीत्या चालविल्या जाणाऱ्या हातभट्टी निर्मिती, विक्री व वाहतुकीवर थेट आघात करण्यात आला.

या कारवाईत एकूण पाच गुन्हे नोंदविण्यात आले असून ३० लिटर गावठी दारू, दारू गाळण्यासाठी वापरण्यात येणारा २ हजार ३७५ लिटर मोहासडवा (रसायन) तसेच हातभट्टीसाठी लागणारे इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. जप्त केलेल्या एकूण मुद्देमालाची किंमत सुमारे ९५ हजार १५० रुपये इतकी आहे.यापुढेही जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले आहे. सदर कारवाईत विभागीय उप आयुक्त डॉ. पराग नवानकर यांच्यासह प्रभारी निरीक्षक अनंतकुमार खांदवे, निरीक्षक एम. के. उईके, दुय्यम निरीक्षक राजरतन मनवर, एम. एस. जाधव, अश्विनी उबाळे, सुरेश चव्हाण तसेच अधिनस्त जवान व कर्मचारी सहभागी झाले होते. दरम्यान, अवैध दारू विक्री अथवा हातभट्टी निर्मितीबाबत नागरिकांनी तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

यासाठी टोल फ्री क्रमांक १८००८३३३३३, व्हॉट्सअॅप क्रमांक ८४२२००११३३ तसेच 'एक्साईज सुविधा पोर्टल'वर संपर्क साधता येणार असल्याचे अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांनी कळविले आहे.

# भारतीय सैन्यात बावीस वर्षे सेवा करुन सेवानिवृत्त झालेले दिपक पिंपळे यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : भारतीय सैन्य दलात २२ वर्ष देश सेवा करून सेवानिवृत्त झालेले क्रांतीनगर भागातील जवान दिपक पिंपळे यांचा पाटोदा शहरातील क्रांतीनगर वासीयांच्या वतीने व पाटोदा नगर पंचायतयचे नगरसेविका सौ.अनिता गिते पाटील, श्रीहरी गिते पाटील यांच्या पुढाकाराने गौरव करण्यात आला.

गुरुवार दिनांक- ०५/०२/२०२६ रोजी हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी पाटोदा नगर पंचायतचे नगराध्यक्ष राजु भैय्या जाधव, पाटोदा पोस्ट ऑफिसचे डाक निरीक्षक विनोद गर्जे, माजी




नगराध्यक्ष सय्यद आदम, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नय्युम भैय्या पठाण, माजी नगसेवक वसीम शेख, सतिष घोलप, आसिफ शेख, भैय्या थोरात, श्याम आडगळे, बंडू तरटे, उध्दव आडगळे, शहादेव फौजी, निजाम फौजी, श्रीकांत धसे, शंकर दळगडे सह इतरांची उपस्थित होती. या वेळी मान्यवरांच्या हस्ते सेवानिवृत्त जवान दिपक पिंपळे यांचा सह कुटुंब सत्कार करण्यात आला. त्याच प्रमाणे या प्रसंगी शहीद जवानच्या मातोश्री व माजी सैनिक नितीन घोलप यांचा हि सत्कार करण्यात आला. या वेळी मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित होते.

# इंडिया ओपन इंटरनॅशनल किक बॉक्सिंग स्पर्धेत साक्षी गितेश कदम हीस सुवर्ण पदक

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** विक्रोळी कन्नमवार नगर ची रहिवाशी साक्षी गितेश कदम हिने ५ व्या इंडिया ओपन इंटरनॅशनल किकबॉक्सिंग कप २०२६ (WAKO) स्पर्धेत किकलाईट महिला (६५ )या गटात भारताचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकाविले आहे.साक्षी ही विक्रोळी साची स्पोर्ट्स अकॅडेमी



येथे प्रशिक्षण घेते. साक्षी कदम हि ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाचे सल्लागार वासुदेव कदम यांची नात आहे.तिने मिळविलेल्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.विक्रोळी ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष श्री राहुल वाघधरे,प्रभात मित्र मंडळाचे सचिव ज्येष्ठ पत्रकार श्री नासिकेत पानसरे,माजी अध्यक्ष ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक श्री कृष्णा काजरोळकर आदिंनी तिचे अभिनंदन केले आहे.

# मैक्स हॉस्पिटल, नागपूरने निरोगी जीवनशैली आणि कर्करोग जनजागृतीसाठी सायक्लोथॉनचे आयोजन केले

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सतीश कडू :** वर्ल्ड कॅन्सर डे निमित्त जनजागृतीचा ठोस संदेश देत मैक्स हॉस्पिटल, नागपूरने कर्करोगाबाबत जागरूकता वाढवण्यासाठी आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी सायक्लोथॉनचे यशस्वी आयोजन केले. या उपक्रमात शेकडो नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला. विविध वयोगट आणि क्षेत्रांतील लोक एकत्र येत निरोगी आणि कर्करोग-जागरूक समाजासाठी सामूहिक संकल्प व्यक्त केला.

कर्करोगाचा धोका कमी करण्यासाठी लवकर निदान, प्रतिबंधात्मक काळजी आणि सक्रिय जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने या सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले. सहभागी नागरिकांनी ठरवलेल्या मार्गावर जोशात सायकल चालवत एकजूट आणि कर्करोगमुक्त भविष्यासाठीची बांधिलकी दर्शवली.

यावेळी बोलताना प्रख्यात इंटरनॅशनल सायकलिस्ट आणि एन्ड्युरन्स ॲथलेट डॉ. अमित समर्थ म्हणाले, "कर्करोग हा आता आशाहीन आजार राहिलेला नाही. वैद्यकीय विज्ञानातील प्रगती, लवकर निदान आणि निरोगी सवयींचा अवलंब यामुळे अनेक प्रकारचे कर्करोग टाळता येऊ शकतात. अशा सायक्लोथॉनसारख्या उपक्रमांमुळे जनजागृती वाढवण्यास आणि लोकांना त्यांच्या आरोग्याची जबाबदारी घेण्यासाठी प्रेरित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली जाते."

मैक्स हॉस्पिटल, नागपूरचे कर्करोग तज्ज्ञ कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून सहभागींसोबत संवाद साधत कर्करोग प्रतिबंध, तपासणी आणि उपचारांविषयी मौल्यवान मार्गदर्शन दिले. तज्ज्ञ पॅनेलमध्ये डॉ. अमोल डोंगरे, डायरेक्टर –मेडिकल ऑन्कोलॉजी; डॉ. शिझान परवेज, असोसिएट डायरेक्टर – रेडिएशन ऑन्कोलॉजी व रेडिओसर्जरी; डॉ.कवडू जवादे, कन्सल्टंट – सर्जिकल ऑन्कोलॉजी तसेच मैक्स हॉस्पिटल, नागपूरचे इतर कन्सल्टंट डॉक्टरांचा समावेश होता.

डॉ.अमोल डोंगरे,डायरेक्टर – मेडिकल ऑन्कोलॉजी,मैक्स हॉस्पिटल, नागपूर म्हणाले, "सुमारे एक-तृतीयांश कर्करोग वेळेवर तपासणी, लवकर निदान आणि नियमित व्यायाम, संतुलित आहार तसेच तंबाखूचे सेवन टाळणे यांसारख्या साध्या जीवनशैलीतील बदलांमुळे टाळता येऊ शकतात. अशा सायक्लोथॉनसारख्या उपक्रमांमुळे वैद्यकीय ज्ञान आणि समाजातील जागरूकता यामधील दरी कमी होते आणि लोकांना दीर्घकालीन आरोग्यासाठी सक्रिय पावले उचलण्यास प्रोत्साहन मिळते."

या कार्यक्रमात विद्यार्थी, कामकाज करणारे व्यावसायिक, सायकलप्रेमी, तसेच मैक्स हॉस्पिटल, नागपूरचे डॉक्टर आणि कर्मचारी यांच्यासह ५०० हून अधिक लोकांनी सहभाग नोंदवला, ज्यामुळे हा खऱ्या अर्थाने समुदाय-केंद्रित उपक्रम ठरला.

सायक्लोथॉनचा समारोप उत्साही वातावरणात झाला. यामध्ये आरजे संवाद, झुंबा सत्र आणि विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स यांसारख्या आकर्षक उपक्रमांचा समावेश होता. लकी ड्रॉमुळे कार्यक्रमात अधिक उत्सुकता निर्माण झाली, ज्यामध्ये सहभागींसाठी नवीन सायकल जिंकण्याची संधी उपलब्ध होती.

या उपक्रमाद्वारे मैक्स हॉस्पिटल, नागपूरने समुदाय आरोग्य, कर्करोग जनजागृती आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेप्रती आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली आणि योग्य वेळी कृती व निरोगी सवयी जीवन वाचवू शकतात हा संदेश दिला.

# जीवन बोधी बौद्ध यांचा रमाई जयंती कार्यक्रमात भारतीय संविधान, सन्मानचिन्ह , शाल ,पुष्पगुच्छ देऊन केला सत्कार

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** नागपूर स्त्री भूषण रमाई आंबेडकर संस्था नागपूर द्वारा आयोजित रमाई आंबेडकर जयंती महोत्सव 2026 सर्वोदय नगर वाठोडा नागपूर येथे त्याच्ग मूर्ती माती रमाई जयंती कार्यक्रम उत्साह साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमात शांतीनगर कावळा पेठ येथील धम्म चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते जीवन बोधी बौद्ध यांना सन्मानचिन्ह ,भारतीय संविधान , शाल , पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.




# वाढदिवस माणुसकीचा: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाच्यानिमित्ताने जे.जे. रुग्णालयात डॉ.नीलम गोऱ्हे यांच्यावतीने नवमाता व बालकांना वस्त्रदान

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते ना. एकनाथजी शिंदे यांचा वाढदिवस म्हणजे केवळ राजकीय सोहळा नव्हे, तर माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी असते. याच भावनेतून, त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयात नवमाता आणि नवजात बालकांसाठी 'वस्त्रदानाचा' हृदयस्पर्शी उपक्रम पार पडला. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते हा कार्यक्रम संपन्न झाला.

आई होण्याच्या आनंदात आणि प्रसूती वेदनेतून सावरणाऱ्या मातांसाठी तसेच या जगात पहिले पाऊल टाकणाऱ्या चिमुकल्या जीवांसाठी हे वस्त्रदान म्हणजे मायेची ऊब ठरली. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्वतः नवमातांशी संवाद साधत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली आणि बालकांना मायेने वस्त्रे अर्पण



केली. अनेक गरजू मातांच्या डोळ्यांत यावेळी समाधानाचे अश्रू तर ओठांवर कृतज्ञतेचे शब्द उमटले.

या उपक्रमादरम्यान डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रुग्णालयातील सोयी-सुविधांचा आढावा घेतला. जे.जे. प्रशासनाने दिलेल्या सर्व प्रस्तावांवर शासन दरबारी सकारात्मक पाठपुरावा करणार असून, आगामी अधिवेशनात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार बैठक घेण्यात येईल असे देखील त्यांनी सांगितले. तसेच, रुग्णालयातील वॉर्ड्सच्या नूतनीकरणासाठी डॉ. गोऱ्हे स्वतः विशेष प्रयत्न करणार आहेत.

मुंबईतील या यशस्वी उपक्रमानंतर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे येथेही डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शहर संघटक आनंद गोयल यांच्या माध्यमातून अशाच प्रकारच्या सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

यावेळी शिवसेना उपनेत्या कला शिंदे, दिलीप नाईक, जितेंद्र सपकाळ, संपर्कप्रमुख वर्षा मोरे, महिला विभागप्रमुख नीलम पवार, रेखा सुरणकर, पुणे शहर संघटक आनंद गोयल, अल्का माने, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली वाढे, संतोष सावंत, जन्नत परवीन आदी शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते त्याचबरोबर या कार्यक्रमास रुग्णालयातील वैद्यकीय डीन डॉ.संजय सुरासे, डॉ.विजय कल्याणकर, डॉ.सोनाली देशमुख, डॉ.अरुण राठोड, डॉ.मयुरी वावधने, डॉ.अर्चना पाटील, चित्रा सेलवराज, नितीन कोलंबकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

जे जे हॉस्पिटलमधील जवळपास सर्व म्हणजे निवासी १००० रुग्णांना अन्नदानही करण्यात आले.माणुसकीच्या स्पर्शाने उजळलेला हा वाढदिवस अनेकांच्या आयुष्यात उत्साहाचा किरण ठरला असून, सर्वांनी लाडक्या उपमुख्यमंत्र्यांना दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या

# अगोदर लोकशाही, नंतर लग्न! निंबायतीत लोकशाहीची अनोखी मिसाल



**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** तालुक्यातील निंबायती गावातील बूथ क्रमांक ७ येथे लोकशाहीबद्दल जागरूकतेचे सुंदर उदाहरण पाहायला मिळाले.येथील नवरदेव सोहेल कादर तडवी यांनी आपल्या लग्नाआधी सर्वप्रथम मतदानाचा हक्क बजावत मतदान केंद्रावर हजेरी लावली.या प्रसंगी अनिस अबेद्दीन तडवी (तालुका अल्पसंख्याक अध्यक्ष) यांची उपस्थिती होती. तसेच ग्रामपंचायत सदस्य अनुप युसुब तडवी, नब्बास तडवी, सैराज तडवी आणि मतदान क्षेत्रीय अधिकारी मॅडम (PRO) हेही उपस्थित होते.सोहेल तडवी यांनी "लोकशाही ही प्रथम कर्तव्य आहे" हा संदेश देत तरुणांसह सर्व नागरिकांना मतदानासाठी प्रेरणा दिली. त्यांच्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.निंबायती गावात या कृतीमुळे लोकशाही मूल्यांना नवी ऊर्जा मिळाली असून, 'अगोदर लोकशाही, नंतर लग्न' हा संदेश सर्वदूर पोहोचला आहे.

# 21व्या राष्ट्रीय लेव्हल अबॅकस स्पर्धेमध्ये प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी देशात प्रथम

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** 21 व्या राष्ट्रीय लेवल स्पर्धेमध्ये प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी अरहान सुरज शेख ने एलिमेंट्री लेवल मध्ये पहिला क्रमांक प्राप्त केला.या स्पर्धेमध्ये भारतातून अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. पाँडीचेरी (तामिळनाडू ) येथे अरहान सुरज शेख याचा मेडल,ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन पी.जी.



नायर सर संस्थेचे व्हाईस चेअरमन इमरान शेख सर,प्राचार्य सुधीर भिसे सर,सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# रमाई महिला मंडळाची एसटी स्थानकास थोर पुरुषांची प्रतिमा व खुर्च्या भेट

**दैनिक युवक आधार**

**नागोठणे/महेंद्र माने :** एस.टी. बस स्थानकात मंगळवार 03 फेब्रुवारी रोजी पेण तालुक्यातील बेणसे सिद्धार्थ नगर येथील रमाई महिला मंडळाच्या अध्यक्षा बौद्धाचार्या ममता भगत यांच्या अध्यक्षतेखाली विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज या थोर पुरुषांच्या प्रतिमा आणि दोन खुर्च्यांची भेट नागोठणे बस स्थानक वाहतूक निरीक्षक मनोहर पवार यांच्या कडे सुपूर्त करण्यात आल्या.

सदरील प्रतिमेंचे विधिवत पूजाअर्चा करून भिंतीवर लावण्यात आल्या. त्यानंतर उपस्थित मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांचे मनोहर पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून आभार व्यक्त केले. यावेळी मंडळाच्या उपाध्यक्षा अश्विनी भगत,सेक्रेटरी सोनाली शिंदे,सहसेक्रेटरी संजीवनी अडसुळे,खजिनदार रुपाली अडसुळे, सहखजिनदार कल्पना अडसुळे तसेच सभासद - कविता अडसुळे,आरती भगत,आशा शिंदे, अमृता शिंदे, अर्चना अडसुळे,लीला ऐटम,सुवर्णा भगत व तेजस्विनी सावंत यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



# धर्मवीर छावा संघटनेच्या वतीने अकरा गरजू महिलांना शिलाई मशीन वाटप

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर/सतिश लोखंडे :** महापुरुषांच्या विचारांना अभिवादन करत धर्मवीर छावा संघटनेच्या वतीने महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यातील " सामाजिक दायित्व उपक्रम " आज मराठी पत्रकार भवन छत्रपती संभाजीनगर येथे पार पडला या पहिल्याच कार्यक्रमात छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील 11 गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत " विकास सन्मान " हा स्वावलंबन पोहचविण्याचा प्रामाणिक हेतूने धर्मवीर छावा संघटनेच्या वतीने महिला सक्षमीकरण व स्वालंबन उपक्रमाअंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .आजच्या काळात महिला हि केवळ घराचे जबाबदारी सांभाळणारी




नसून हे कुटुंबाची कणा समाजाची ताकद आणि महाराष्ट्राची प्रेरणा आहे. मात्र अनेक गरजू , कष्टकरी , विधवा ,आर्थिक दूबल घटकातील , गरजू महिलांना शिलाई मशीन वाटप करून त्यांना स्वावलंबनाच्या दिशेने एक नवी वाट दाखवण्याचा धर्मवीर छावा संघटनेचा प्रामाणिक प्रयत्न असल्याचा दावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गणेश उगले पाटील यांनी सांगितले समाजपयोगी कार्यातूनच खऱ्या अर्थाने परीवर्तन घडते या विश्वासातून संघटना सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी नमूद केले. या समाजहिताच्या प्रेरणादायी आणि महीलाच्या जिवनात नवी आशा निर्माण करणाऱ्या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून द्वारका दास श्यामकुमार वस्त्र दालनाचे संचालक व उद्योजक श्री सदाशिवराव जाधव , वरीष्ठ कायदेतज्ज्ञ सदानंद सोनुने , यांच्यासह धर्मवीर छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गणेश उगले पाटील, नानाभाऊ कोल्हे , अंकुश सकुंडे पाटील , गणेश बनसोडे , सतिश देवखळे , रविंद्र शेजवळ , स्वप्निल बीडकर विनायक गंपले , मिना ताई कडे , ज्योती ताई शिंदे , आरती मगर , गणेश सोळूंके , भाऊसाहेब बोरसे , कारभारी कड ,ओकर शिंदे , अमोल साळूंके , आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिवंगत राम पाटील चषकाचे महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**उलवे,प्रतिनिधी:** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची धामधूम संपताच आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत रविवारी चिर्ले येथे मैदानावर उतरले. त्यांच्या हस्ते विनोद स्पोर्टस गावठाण आयोजित दिवंगत राम बाळू पाटील चषकाचे उद्धाटन चिर्ले येथील राधेय मैदानावर करण्यात आले.



यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "पक्ष-पंथ बाजूला ठेवा, गावचा विकास महत्त्वाचा. मैदान हा आपला हक्क आहे. दिबांचे कार्य अतुलनीय आहे. दि. बा. पाटील साहेब आपणा सर्वांची अस्मिता आहेत. त्यांचे म्हणणे होते, हुतात्म्यांचे रक्त वाया जात नाही, जाऊ द्यायचे नसते. त्यामुळे मी हक्कांसाठी लढतोय. एखादे काम मार्गी लावायचे असेल राजकीय इच्छाशक्ती असली पाहिजे. सध्याचे आमदार उरणमधील मै दानांसाठी पुढाकार का घेत नाहीत. जनतेने त्यांना जाब विचारायला हवा. सिडकोकडून गावांच्या विकासासाठी पाच टक्के निधी मिळणे गरजेचे आहे, पण अलीकडे तसे होताना दिसत नाही. तरुणांना नोकऱ्या उपलब्ध आहेत, परंतु अनेक ठिकाणी त्यांना डावलले जातेय. मी मात्र तरीही वर्षाला साडेतीनशे नोकऱ्या देतोय."

यावेळी विनोद म्हात्रे, समीर मढवी, युवा नेते मेघनाथ मढवी, राजेश पाटील, विजय मढवी, राकेश माळी, श्रीकांत पाटील, विकास पाटील, विवेक म्हात्रे, शनिदास म्हात्रे, विकास पाटील, पांडुरंग आप्पा चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

## 52 हजार रुपये किमतीच्या बुटांची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** अनोळखी इसमाने 52 हजार रुपये किमतीच्या बुटांची चोरी केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात 4 फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.प्रजापती औरनाईट को-ऑपरेटिंग हाऊसिंग सोसायटी, सेक्टर 10, राजीव गांधी मैदानासमोर नवीन पनवेल या सोसायटीतील रहिवाशांनी घराच्या बाहेर शूज रॅक मध्ये ठेवलेले शूज अनोळखी इसमाने चोरून नेले.

## बारा तोळ्याची सोन्याची गंठण परत न करता केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** 12 तोळे वजनाची सोन्याची गंठण घालण्यासाठी दिली असता ती परत न करता महिला घरातून निघून गेल्या प्रकरणी खांदेशवर पोलीस ठाण्यात चार फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. उज्वला गोटीराम पाटील ह्या नेवाळी येथे राहत असून त्यांच्या शेजारी शितल काथारा राहतात. 22 जानेवारी रोजी शितल यांनी त्या चिंधरण येथे माघी गणपतीला जाणार आहे. व दोन दिवसांसाठी सोन्याची गंठण घालण्यासाठी मागितली. यावेळी तिला सोन्याची गंठण दिली. दोन दिवसांनी गंठण मागण्यासाठी शितलच्या घरी गेले असता गंठण घेऊन येते असे सांगितले. 30 जानेवारी रोजी पुन्हा काथारा यांच्या घरी गेले असता शितल घरातून काहीही न सांगता निघून गेल्याचे समजले.

## दोन लाख 70 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** डेबिट कार्ड आणि क्रेडिट कार्ड मधून 2 लाख 70 हजार 772 रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इस्माविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 3 फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.शरदचंद्र प्रधान हे पनवेल येथे राहत असून त्यांना त्यांचे गॅस कनेक्शन रात्री कट करण्यात येणार आहे असा व्हाट्सअप वर मेसेज आला. यावेळी पेमेंट केल्याचा त्यांनी मेसेज केला. मात्र ते अपडेट झाले नाही अपडेट करावे लागेल यासाठी व्हिडिओ कॉल आला आणि त्यांच्या मुलीने अपडेट करण्याची प्रक्रिया केली. यावेळी व्हाट्सअप वर महानगर गॅसची डॉट एपीके फाईल पाठवली. ती फाईल ओपन करून बारा रुपये पाठवण्यास सांगितले. यावेळी बँकेच्या कार्डची डिटेल मागितली. त्यांनी क्रेडिट कार्डची डिटेल दिली. पेमेंट डिकलाईन होत असल्याचे सांगून दुसऱ्या कार्डची डिटेल्स मागितली. त्यांनी डेबिट कार्डची डिटेल्स समोरच्या व्यक्तीला दिली. यावेळी बँकेतून रक्कम जात असल्याचे मेसेज त्यांना आले. महानगर गॅस मध्ये अपडेट करण्याचे दाखवून अज्ञाताने दोन लाख 70 हजार 722 रुपयांची फसवणूक केली.

## घरफोडीत आठ लाखांचा ऐवज लंपास

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** नवीन पनवेल सेक्टर 12 येथे चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत आठ लाख 11 हजारांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तीन फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.प्रमोद कोरडे हे निवांत बंगला, सेक्टर 12, नवीन पनवेल येथे राहत असून ते नातीच्या लग्नासाठी चेंबूर येथे गेले होते. चोरांनी त्यांच्या घरात प्रवेश करून सोन्याचे दागिने, घड्याळ, रोख रक्कम असा आठ लाख 11 हजारांचा ऐवज चोरून नेला.

## जावयाने सासूला केली मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** जावयाने सासूला मारहाण केल्या प्रकरणी 3 फेब्रुवारी रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.यातील 45 वर्षीय महिला या टेंभोडे येथे राहत असून 2 फेब्रुवारी रोजी त्या नवीन पनवेल येथील गार्डनमध्ये साफसफाई करत होत्या. यावेळी त्यांचा जावई आला आणि त्याने तुमच्या मुलीला मस्ती आली आहे असे बोलून लोखंडी सळईने त्यांना मारहाण केली आणि तो पळून गेला. त्यांच्यावर प्राचीन हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.

# अकोल्यात रियल इस्टेट लिगल अवेअरनेस व संवाद कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक//अकोला :** रियल इस्टेट क्षेत्रात पारदर्शकता, सुरक्षितता व कायदेशीर जनजागृती वाढविण्याच्या उद्देशाने भारतीय रियल इस्टेट सल्लागार एजंट वेलफेअर युनियन (भारत) यांच्या वतीने अकोला जिल्ह्यात "रियल इस्टेट लिगल अवेअरनेस व संवाद कार्यक्रम" आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत कृषक भवन, मूर्तिजापूर मार्ग, स्टेडियमजवळ, पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला येथे संपन्न होणार आहे.




या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश रियल इस्टेट क्षेत्राशी संबंधित व्यावसायिक, सल्लागार, एजंट, बिल्डर व डेव्हलपर यांना मालमत्तेशी संबंधित कायदेशीर तरतुदी, दस्तऐवजीकरण प्रक्रिया तसेच सुरक्षित व्यवहार याबाबत जागरूक करणे हा असून, यामुळे रियल इस्टेट क्षेत्र अधिक सुरक्षित, संघटित व पारदर्शक होण्यास मदत होईल.

कार्यक्रमात रियल इस्टेट क्षेत्रात होणाऱ्या फसवणुकीपासून बचाव, कायदेशीर वाद टाळण्याचे उपाय, नोंदणी प्रक्रिया तसेच गुंतवणूक सुरक्षितता यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच रियल इस्टेट सल्लागार व एजंट यांची भूमिका, सुरक्षितता आणि त्यांचे हक्क यावरही विशेष चर्चा होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन दुपारी ३ वाजता होणार असून, उद्घाटन समारंभालाआमदार अकोला माननीय श्री रणधीर सावरकर (मुख्य अतिथी) म्हणून उपस्थित राहणार आहेत.

महापौर अकोला सौ. शारदा खेळकर (विशेष अतिथी) म्हणून उपस्थित राहणार आहेत.

जिल्हाधिकारी (भा.प्र.से.) सौ. वर्षा मीना (सन्माननीय अतिथी) म्हणून उपस्थित राहणार आहेत.तसेच नारेडको (NAREDCO) अध्यक्ष श्री सुनील इंदानी (प्रमुख मार्गदर्शक) म्हणून उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमाचा समारोप सायंकाळी ७ वाजता होणार असून, समारोप समारंभालाखासदार अकोला माननीय श्री अनुपजी धोत्रे (प्रमुख अतिथी) म्हणून उपस्थित राहणार आहेत.तसेच पोलीस अधीक्षक अकोला श्री अर्चित चांडक (अतिथी) आणि मनपा आयुक्त अकोला डॉ. सुनील लहाने (अतिथी) म्हणून उपस्थित राहणार आहेत.युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, रियल इस्टेट हे देशाच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे क्षेत्र असून, कायदेशीर माहितीअभावी अनेकदा वाद व फसवणुकीचे प्रकार घडतात. अशा परिस्थितीत या प्रकारचे जनजागृती व संवाद कार्यक्रम रियल इस्टेट क्षेत्रात विश्वास, पारदर्शकता व संघटनात्मक बळकटी निर्माण करण्यास उपयुक्त ठरणार आहेत.युनियनच्या वतीने अकोला जिल्ह्यातील सर्व रियल इस्टेट व्यावसायिक, सल्लागार, एजंट तसेच संबंधित नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महासमाधीभूमी, सिंदपुरी रुयाळ येथे 39 व्या वर्धापन दिनानिमित्त लाखो लोकांनी घेतला धम्मदेशना कार्यक्रमाच्या लाभ



**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा -**पवनी तालुक्यातील सिंदपुरी रुयाळ येथे 8 फेब्रुवारी 2026 ला 39 व्या वर्धापन दिनानिमित्त लाखो लोकांनी सिंदपुरी रुयाळ येथे आपली हजेरी लावून धम्मदेशना प्रबोधन कार्यक्रमाचा लाभ घेतला. त्याचप्रमाणे केंद्रीय संविधान रक्षक समितीच्या वतीने माता रमाई यांच्या जयंतीचा कार्यक्रम .त्याचप्रमाणे समाज प्रबोधन कार्यक्रम सुद्धा घेण्यात आला. सदर कार्यक्रमात 4 ते 5 हजार पर्यटकांकरिता बफे डिनर जेवणाची व पाण्याची सुद्धा व्यवस्था करण्यात आली होती.

# शिराळा येथील श्री. व्यंकटराव शामराव देशमुख यांची शताब्दी उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**केज प्रतिनिधी :** शिराळा येथील देशमुख परिवारातील सर्वात ज्येष्ठ नागरिक श्री. व्यंकटराव शामराव देशमुख यांनी आयुष्याची शंभर वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांच्या शताब्दी सोहळ्याचे आयोजन त्यांच्या मुलांनी व नातवांनी समस्त देशमुख कुटुंबीयांच्या वतीने अत्यंत आनंदी व भावनिक वातावरणात करण्यात आले.



आयुष्यभर देवाच्या निस्सीम भक्तीमध्ये तल्लीन होऊन प्रामाणिकपणे कार्य करत राहिलेले व्यंकटराव देशमुख हे कष्ट, श्रद्धाळू, शांत, संयमी, साधेपणा व संस्कारांचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या शताब्दी सोहळ्यास नातेवाईक, मित्रपरिवार, गावकरी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आजोबांचे औक्षण करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. कुटुंबीयांनी पुष्पहार घालून त्यांचा सन्मान केला. उपस्थितांनी त्यांच्या आयुष्यातील प्रेरणादायी आठवणी सांगत भावना व्यक्त केल्या. त्यांच्या संस्कारांमुळेच आज कुटुंब प्रगतीपथावर असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

शंभर वर्षांचे आयुष्य पूर्ण करताना आजोबांनी समाधान, संयम व सकारात्मक विचार हे दीर्घायुष्याचे गमक असल्याचे सांगितले. हा शताब्दी सोहळा कुटुंबासह संपूर्ण गावासाठी प्रेरणादायी ठरला. शिराळा येथील समस्त देशमुख परिवारातील सदस्यांनी संस्कार रुजवण्याची कार्य अतिशय उत्सुक पणे पूर्ण केलेले आहे. त्यांच्या या कार्यातून प्रत्येक व्यक्तीचे आई-वडील आजी आजोबा तसेच परिवारातील ज्येष्ठ सदस्य जिवंत असतानाच त्यांची काळजी घेऊन त्यांचा व्यवस्थित संभाळ करण्यात यावा असा बोध सर्व समाजात देशमुख परिवारांनी दिला.

# शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार चे वितरण रिसोड येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रिसोड (तालुका प्रतिनिधी) रणजितसिह. ठाकुर :** दिनांक ०८/०२/२०२६ रोजी विद्यार्थी हक्क कृती समिती महाराष्ट्र राज्य, वाशिम जिल्हा आयोजित. शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार व विद्यार्थी हक्क कृती समिती सर्व पदाधिकारी मेळावा रिसोड येते संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रास्तविकेमधून अध्यक्ष मा. श्री. सुमित मधुकर जमधाडे (जिल्हा अध्यक्ष विद्यार्थी हक्क कृती समिती महाराष्ट्र राज्य) यांनी या पुरस्काराबद्दल माहिती दिली. विद्यार्थी कृती समितीचे कार्य कसे समाज उपयोगी आहे. याविषयी आपले मत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती मा. श्री. राहुलभाऊ बोडखे (पंचायत समिती सदस्य रिसोड) मा.श्री. रोहितभाऊ दांदडे (नगरसेवक



तथा शासकीय कंत्राटदार मा. तोसिफ शेख (वं.ब.आ.ता. युवाउपाध्यक्ष) मा. श्री. राम बाळासाहेब देशमुख मा. श्री. दत्तरावजी धांडे (विदर्भवादी नेते) विश्वनाथ सानप व इतर सर्व मान्यवर उपस्थित होते त्यांनी आपापली मते या ठिकाणी व्यक्त केली. कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रातील उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना आदर्श पुरस्कार देण्यात आले. यामध्ये 1) आदर्श कृषी शेतकरी-
परमेश्वर हुंबाड
2) युवा उद्योजक
-विठ्ठल बोडखे (सूर्या चाय)
3) समाज सेवक-
सदानंद गायकवाड
4) आरोग्य विभाग
-छाया धांडे
5) आरोग्य विभाग-
डॉ. निखिल साळवे
6) आदर्श सामाजिक संस्था -
सुभेदार रामजी ट्रस्ट एकता नगर रिसोड (अध्यक्ष-अलंकार खैरे व सदस्य दामोदर धांडे, मेजर कळासरे, सुनिल गवई)
7) कला व साहित्य-
डॉ. सिद्धार्थ इंगोले
8) आदर्श शिक्षक ग्रामीण
-गजानन घोटे
9) आदर्श शिक्षक शहरी-
डॉ. प्रकाश हनवते
10) सामाजिक कार्य-
डॉ. विजय गायकवाड
11) क्रीडा-
हनुमान कोरडे
12) समाज प्रबोधन
-शालिकराम पठाडे(उपाध्यक्ष तथा जिल्हासंस्कारप्रमुख भारतीय बौद्ध महासभा)
13) युवा प्रत्रकार
-केशव गरकळ. त्याचबरोबर शिवछत्रपती युवा सन्मान, पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये अनेक युवक उपस्थित होते सिद्धार्थ घुगे, पवन धांडे, ऋषिकेश महाजन, धीरज वाशिमकर, अंकुश गिरी, सुशील खरात, हर्षद गवई, साहिल जाधव, दीपक बोडके, वैभव झुंगरे, ऋषिकेश इंगळे, मंगेश पडघान, राहुल वाशीमकर, अनिकेत पंडित, शिवम वाघ, वैभव बाबर, कैलास जाधव, संदीप शिंदे, सोपान अंभोरे, शुभम पुंड, मधुकर जमदाडे, अंजली खरात, शिवप्रसाद काष्टे, कैलास जाधव, शुभम जमदाडे, ज्योती जमदाडे इत्यादी ययुव-युवती उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. गायत्री देशमुख यांनी केले आणि कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सिद्धार्थ घुगे यांनी केले.

# विरार-डहाणू चौपदरीकरण प्रकल्पातील विलंब, खर्च वाढीचा प्रश्न अनुत्तरित

**पालघर :** पश्चिम रेल्वेने विरार ते डहाणू रोड रेल्वे चौपदरीकरण प्रकल्प राबवण्यासाठी घेतला असून मार्च २०२३ मध्ये पूर्ण होणारा प्रकल्प जून २०२७ मध्ये पूर्ण करण्याची उद्दिष्ट रेल्वे व्यवस्थापना तर्फे ठेवण्यात आले आहे. मात्र मूळ ३५५५ कोटी रुपयांच्या प्रकल्पा च्या किंमतीमध्ये या विलंबामुळे किती वाढ झाली तसेच प्रत्यक्षात नव्या मार्गीके वरून गाडी कधी धावणार या बाबत रेल्वे व्यवस्थापनाने माहिती देण्याचे टाळले आहे. एकंदर चौपदरीकरण प्रकल्पाच्या कामाची गती पाहता हा प्रकल्प आणखी काही वर्षांनी पुढे ढकलला जाण्याची शक्यता आहे.

पश्चिम रेल्वेच्या विरार ते डहाणू रोड दरम्यानच्या चौपदरीकरण प्रकल्प हा पालघर जिल्ह्यातील पायाभूत सुविधांसाठी महत्त्वाचा असून मार्च २०२३ मध्ये पूर्ण करण्याच्या उद्दिष्टाला विविध विभागांकडून परवानगा मिळणे तसेच भूसंपादन प्रक्रियेत विलंब झाल्याने पाठी पडला आहे. या प्रकल्पाला झालेल्या मोठ्या विलंबामुळे खर्च किती वाढला आहे, याबाबत स्पष्ट माहिती देण्यात संबंधित यंत्रणेला अपयश आले आहे, अशी धक्कादायक बाब नुकत्याच प्राप्त झालेल्या माहिती अधिकार (RTI) उत्तरातून समोर आली आहे.

माहिती अधिकारांतर्गत विचारण्यात आलेल्या प्रश्नांना उत्तर देताना प्रकल्पाची तात्पुरती पूर्णत्वाची तारीख जून २०२७ अशी सांगण्यात आली आहे. म्हणजेच, नियोजित वेळेपेक्षा सुमारे चार वर्षांचा विलंब झाल्याचे स्पष्ट होते. मात्र, या विलंबामुळे प्रकल्पाच्या मूळ मंजूर खर्चात किती वाढ झाली आहे, याबाबत विचारलेल्या थेट प्रश्नावर "नोंद उपलब्ध नाही" असे उत्तर देण्यात आले आहे.

कोट्यवधी रुपयांचा सार्वजनिक निधी खर्च होणाऱ्या या महत्त्वाच्या प्रकल्पाबाबत खर्चवाढीची नोंद उपलब्ध नसणे हे गंभीर आणि चिंताजनक आहे. प्रकल्प उशिरा पूर्ण झाल्यास त्याचा थेट परिणाम खर्चावर होतो. महागाई, साहित्य दरवाढ, कामगार खर्च आणि कंत्राटी अटींमधील बदल यामुळे अंतिम खर्च मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता असून अशा परिस्थितीत खर्चवाढीचा अधिकृत तपशील उपलब्ध नसणे हे पारदर्शकतेच्या दृष्टीने प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे असे प्रवासी संघटनेच्या प्रतिनिधींचे म्हणणे आहे.

रेल्वे प्रशासनाने या चौपदरीकरणप्रकल्पासाठी जमीन संपादन, वैधानिक परवानग्या आणि इमारती व मार्गावरील पूल चे डिझाईन अंतिम झाल्याचे तसेच काम सुरू असल्याचे नमूद केले आहे. तरीही, गेल्या चार वर्षांच्या विलंबाबद्दल जबाबदारी निश्चित करणे आणि त्यातून झालेल्या आर्थिक परिणामांची स्पष्ट माहिती जनतेसमोर मांडण्याचे टाळले आहे.

डहाणू रोड ते विरार दरम्यान दररोज हजारो प्रवासी या मार्गावर प्रवास करतात. चौपदरीकरणामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार असला, तरी सततचा विलंब आणि खर्चाबाबतची अस्पष्टता यामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या सुधारित अंदाजपत्रकाची, आतापर्यंत झालेल्या खर्चाची आणि अपेक्षित अंतिम खर्चाची सविस्तर माहिती तातडीने जाहीर करावी, अशी मागणी प्रवासी संस्था आणि स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

पारदर्शकता आणि उत्तरदायित्व राखण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे देणे गरजेचे आहे. अन्यथा, सार्वजनिक निधीच्या वापराबाबत संशय निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही असे देखील प्रवासी संघटनेच्या प्रतिनिधींनी यांनी सांगितले आहे.

**प्रकल्प पूर्ण करण्याची मुदत हास्यास्पद**

चौपदरीकरण प्रकल्पात विरार पासून केळवे रोड पर्यंत व बोईसर पलीकडून डहाणूपर्यंत कामाला गती प्राप्त झाली असली तरीही पालघर व बोईसर रेल्वे स्थानक दरम्यान चौपदरीकरणाच्या कामाचा नारळ फुटला नसल्याचे दिसून आले आहे. पालघरला असणारे स्टेशन मास्टर व कंट्रोल रूम कार्यालय स्थलांतरित करणे, अस्तित्वात असलेल्या रेल्वे रुळाच्या पश्चिमेला नवीन लाईन टाकण्याच्या दृष्टीने प्रवेशद्वार व रस्त्याची जोड करण्यासाठी मुबलक क्षमता असणारे पुलाची निर्मिती करणे, सरकते जिने व उद्धवाहक सुविधा निर्माण करणे प्रलंबित राहिले आहे.

# उमेश कामत- प्रिया बापट यांचा 'बिन लग्नाची गोष्ट' ॲमेझॉन प्राईमवर करत आहे ट्रेंड

उमेश कामत- प्रिया बापटची 'बिन लग्नाची गोष्ट' ॲमेझॉन प्राईमवर ट्रेंड करत आहे. नात्यांचा गुंता, प्रेमातील गोडवा आणि थोडीशी नोकझोक सांगणारा 'बिन लग्नाची गोष्ट' हा चित्रपट सध्या ॲमेझॉन प्राईमवर अनेकजण पाहात आहेत. चित्रपटगृहात प्रदर्शित झाल्यानंतर आता ओटीटीवरही या चित्रपटानं पुन्हा एकदा प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. ज्यांना हा चित्रपट चित्रपटगृहात पाहाता आला नाही, त्यांना आता 'बिन लग्नाची गोष्ट' ॲमेझॉन प्राईमवर पाहाता येईल. नात्यांमधील समज, मतभेद, विश्वास आणि जिव्हाळा या सगळ्यांचा सुंदर मिलाफ या चित्रपटात पाहायला मिळेल. आधुनिक काळातील नात्यांकडे नव्या दृष्टीने पाहाणारा हा चित्रपट प्रेक्षकांना आपलासा वाटत आहे. ओटीटीवर आल्यानंतर नव्या प्रेक्षकवर्गाकडूनही या




चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळत असून तो सध्या चर्चेत आहे.

**प्रिया बापट आणि उमेश कामत यांचा नवीन चित्रपट :** प्रिया बापट आणि उमेश कामत या रिअल लाईफ कपलची ऑनस्क्रीन केमिस्ट्री प्रेक्षकांना नेहमीच भावली आहे आणि या चित्रपटातही त्यांच्या नात्यातील गोड-तिखट प्रसंगांनी प्रेक्षकांना आवडले आहे. त्यांच्या सोबत गिरीश ओक, निवेदिता सराफ, सुकन्या मोने आणि संजय मोने यांच्या दमदार अभिनयानं चित्रपट अधिक प्रभावी झाला आहे. दिग्दर्शक आदित्य इंगळे म्हणतात, "बिन लग्नाची गोष्ट' आपल्याच आजूबाजूच्या नात्यांचे प्रतिबिंब आहे.'

**'बिन लग्नाची गोष्ट' चित्रपटाला मिळाला ॲमेझॉन प्राईमवर चांगला प्रतिसाद :** त्यांनी पुढं म्हटलं "नात्यातील मतभेद, एकमेकांवरील विश्वास आणि एकत्र प्रवास हे या चित्रपटात आम्ही दाखवले आहे. ॲमेझॉन प्राईमवर चित्रपटाला मिळणारा प्रतिसाद पाहून खूप आनंद होतो आहे." निर्माते नितीन वैद्य म्हणतात, "हा चित्रपट नात्यांच्या बदलत्या स्वरूपावर विचार करायला भाग पाडणारा आहे. आजच्या पिढीचे आयुष्य, त्यांची नात्यांकडे पाहाण्याची दृष्टी, त्यातील गोडवा आणि संघर्ष हे या चित्रपटात मांडले आहे. चित्रपटगृहानंतर ओटीटीवर मिळणारा प्रेक्षकांचा प्रतिसाद आमच्यासाठी बक्षीस आहे." गॉडगिफ्ट एंटरटेन्टमेंट प्रा. लि. आणि एस. एन. प्रॉडक्शन्स यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून, तेजश्री अडिगे आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन प्रस्तुत 'बिन लग्नाची गोष्ट' चित्रपटाची कथा समीर कुलकर्णी यांची आहे.

# दिलीप प्रभावळकर-रोहिणी हट्टंगडी यांचा 'आता वेळ झाली' चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित

सध्या ओटीटीवर एकापेक्षा एक अशा कथानक असलेल्या मराठी सीरिज व चित्रपट पाहायला मिळत आहेत. यातच आता अजून एका कलाकृतीची भर पडली आहे. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या आणि ऑस्करपर्यंत पोहोचलेल्या 'दशावतार'मुळे चर्चेत असलेले ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर व रोहिणी हट्टंगडी यांचा एक अत्यंत भावनिक आणि विचार करायला भाग पाडणारा चित्रपट नुकताच ओटीटीवर रिलीज झाला आहे.

रोहिणी हट्टंगडी व दिलीप प्रभावळकर मराठी इंडस्ट्रीतील ज्येष्ठ कलाकार आहेत. आजवर त्यांनी त्यांच्या सदाबहार अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. अशातच आता ते एकाच चित्रपटातून ओटीटीवर प्रेक्षकांना पहायला मिळणार आहेत. २०२४ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला त्यांचा 'आता वेळ झाली' हा चित्रपट ओटीटीवर पाहण्यासाठी उपलब्ध झाला आहे. हा चित्रपट कुठे पाहता येईल, यांची गोष्ट नेमकी कशी आहे, याबद्दल सविस्तर जाणून घेऊयात…

**चित्रपटाची कथा काय आहे?**

अनंत नारायण महादेवन दिग्दर्शित 'आता वेळ झाली' हा चित्रपट फेब्रुवारी २०२४ मध्ये प्रदर्शित झालेला. हा चित्रपट भावनिक आहे, ज्याची स्टोरीटेलिंग अनेकांच्या पसंतीस पडली. 'आता वेळ झाली' हा चित्रपट म्हातारपण आणि




एका वृद्ध दाम्पत्याच्या आयुष्याबद्दल आहे. वय वाढल्यावर नातेसंबंध, भावना आणि रोजच्या जीवनावर कसा परिणाम होतो हे दाखवतो. हा चित्रपट सोबत, भावनिक आधार आणि वृद्ध लोकांना भेडसावणाऱ्या पण न बोलल्या जाणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकतो. रोहिणी हट्टंगडी आणि दिलीप प्रभावळकर यांनी मुख्य भूमिका अतिशय संवेदनशीलतेने साकारल्या आहेत. त्यांचा साधा आणि नैसर्गिक अभिनय लक्ष वेधून घेतो.

कथा शशिधर आणि रंजना या निरोगी पण वृद्ध जोडप्याची आहे. आजारपण, परावलंबित्व किंवा असहाय्य होऊन त्रास सहन करण्यापेक्षा ते स्वतःच्या इच्छेने आयुष्य संपवायचा निर्णय घेतात. आयुष्यावर नियंत्रण असतानाच सन्मानाने जायची त्यांची इच्छा असते, त्यामुळे मृत्यूच्या हक्काबद्दल विचार करायला लावणारी ही गोष्ट आहे.

हा एक सायकोलॉजीकल चित्रपट आहे. यामध्ये दिलीप प्रभावळकर (शशिधर लेले), रोहिणी हट्टंगडी (रंजना लेले), शिवराज वायचळ (तरुण शशिधर लेले), भाग्यश्री लिमये (तरुण रंजना लेले) या भूमिकांमध्ये पाहायला मिळतात. शेजाऱ्याच्या भूमिकेत जयवंत वाडकर, तसेच अभिनय पाटेकर, वृत्तपत्र संपादकाच्या भूमिकेत भरत दाभोळकर, वकिलाच्या भूमिकेत गुरु ठाकूर आणि स्मिता तांबे असे अनेक कलाकार आहेत. हा चित्रपट एका खऱ्या घटनेवर आधारित असून इच्छामरणासारख्या नाजूक विषयावर प्रकाश टाकतो.

# 'बालभारती'च्या आठवणींना उजाळा देणारं खास गाणं 'बालभारती गीत' प्रेक्षकांच्या भेटीला



बालभारतीच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त 'बालभारती गीत' हे खास भावस्पर्शी गीत प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. अनेक पिढ्यांच्या बालपणाचा अविभाज्य भाग असलेल्या बालभारतीच्या पुस्तकांशी जोडलेल्या आठवणी, भावना आणि संस्कार या गीतातून सुंदरपणे उलगडण्यात आले आहेत. या गाण्याला लोकप्रिय गायिका वैशाली सामंत यांचा आवाज लाभला असून, अवधूत गुप्ते यांचं संगीत आणि दासू वैद्य यांचे शब्द या गाण्याला लाभले आहेत. या गीतासाठी बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक यांचे मार्गदर्शन लाभले असून संकल्पना किशोर मासिकाचे संपादक किरण केंद्रे यांची आहे.



बालभारती नाव उच्चारताच मनात दरवळणारा पुस्तकांचा सुगंध, मुखपृष्ठांवरील बोलकी चित्रं, कवितांच्या ओळींमधून मिळालेली भाषेची पहिली ओळख आणि संस्कारक्षम दृष्टी या सगळ्याच भावना या गीतातून प्रत्ययास येतात. हे गाणं पाहाताना आणि ऐकताना रसिक नकळत आपल्या शाळेच्या दिवसांत, बालपणाच्या आठवणींत हरवून जातील. एकवीरा म्युझिकवर हे 'बालभारती गीत' उपलब्ध असून, त्याचं सादरीकरण एकविरा म्युझिक युट्युब चॅनेलवर पाहायलाही तितकंच सुंदर आणि भावनिक ठरत आहे.

बालभारती संचालिका अनुराधा ओक म्हणतात, '''बालभारती ही केवळ पुस्तकांची मालिका नाही, तर आपल्या सगळ्यांच्या आयुष्यातला पहिला संस्कारक्षम स्पर्श आहे. या गीतातून त्या आठवणी, तो कोवळा उजेड आणि बालपणाची निरागस भावना जशीच्या तशी जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. प्रत्येक प्रेक्षकाला हे गीत पाहाताना स्वतःचं बालपण पुन्हा एकदा अनुभवता यावे, हीच इच्छा आहे."

या गीताबद्दल संगीतकार अवधूत गुप्ते म्हणतात, ''बालभारती माझ्याही बालपणाचा अविभाज्य भाग आहे. या गीताचं संगीत करताना केवळ सूर नाही, तर आठवणी, भावना आणि संस्कार जपण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक पिढीला आपल्या बालपणाशी पुन्हा एकदा जोडणारा हा अनुभव आहे. हे गाणं ऐकताना, पाहाताना नाकात तो बालभारतीच्या पुस्तकातील सुगंध नक्कीच दरवळेल.''बालभारतीच्या पुस्तकांनी दिलेल्या संस्कारांचा, कल्पनाशक्तीचा आणि ज्ञानप्रवासाचा हा सांगीतिक उत्सव प्रेक्षकांच्या मनात घर करेल हे नक्की !

# कॉमेडीचा बादशाहची आता लवकरच थिएटरमध्ये धमाल, 'भूत बंगला' चित्रपटाची रिलीज डेट जाहीर

बालाजी मोशन पिक्चर्सची आगामी फिल्म 'भूत बंगला', ज्यात अक्षय कुमार मुख्य भूमिकेत झळकणार आहेत, तिची रिलीज डेट बदलण्यात आली आहे. याआधी हा चित्रपट १५ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणार होता, मात्र आता मेकर्सनी हा चित्रपट प्रीपोन करत १० एप्रिल २०२६ रोजी सिनेमागृहात आणण्याचा निर्णय घेतला आहे.

हा निर्णय पूर्णपणे रणनीतीपूर्वक घेतल्याचे मानले जात आहे. अक्षय कुमार यांच्या वर्षभरातील व्यस्त थिएट्रिकल रिलीज लाइनअपचा विचार करून आणि प्रेक्षकांचे लक्ष एका चित्रपटावर केंद्रित राहावे, यासाठी ही नवी रिलीज डेट ठरवण्यात आली आहे. कमी बॉक्स ऑफिस



स्पर्धा असलेल्या काळात चित्रपट प्रदर्शित करून त्याला योग्य वेळ आणि स्पेस मिळावी, हाच मेकर्सचा मुख्य उद्देश आहे.

'भूत बंगला'बाबत घोषणा झाल्यापासूनच प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, हा चित्रपट अक्षय कुमार यांना एका दमदार कॉमेडी-एंटरटेनर अवतारात सादर करणार आहे. अक्षय कुमार स्वतःही आपल्या प्रत्येक चित्रपटाला सिनेमागृहात योग्य वेळ मिळावा, याकडे विशेष लक्ष देत असल्याचे दिसते.

हा चित्रपट बालाजी मोशन पिक्चर्स (बालाजी टेलिफिल्म्स लिमिटेडचा एक विभाग) आणि केप ऑफ गुड फिल्म्स यांच्या संयुक्त विद्यमाने सादर करण्यात येत आहे. चित्रपटात अक्षय कुमार यांच्यासोबत वामिका गब्बी, परेश रावल, तब्बू आणि राजपाल यादव महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन प्रियदर्शन यांनी केले असून, निर्मितीची जबाबदारी अक्षय कुमार, शोभा कपूर आणि एकता आर कपूर यांनी सांभाळली आहे.

# भूक लागल्यावर पोटातून 'गुडगुड' आवाज का येतो? ; जाणून घ्या

अनेकदा आपल्या पोटातून अचानक गुडगुड असा आवाज येतो. शरीराकडून होणारी ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. एखाद्या शांत ठिकाणी आपण असलो आणि हा आवाज आला तर ऑक्वर्ड व्हायला होते. बहुतांशवेळा पोट रिकामे असल्यावर किंवा भूक लागल्यावर हा आवाज येत असतो. पण यामागचे नेमके वैज्ञानिक कारण तुम्हाला माहित आहे का? चला तर मग जाणून घेऊया…

भूक लागल्यावर किंवा कधीकधी जेवण झाल्यावरही पोटातून येणाऱ्या आवाजाला वैज्ञानिक भाषेत 'बोर्बोरिगमी' (Borborygmi) असे म्हणतात. हा आवाज केवळ पोटातून नाही, तर प्रामुख्याने आपल्या लहान आणि मोठ्या आतड्यांमधून येत असतो. पोटातून हा आवाज येणे ही शरीराची एक नैसर्गिक प्रक्रिया आहे.

आपली पचनसंस्था ही एका लांब नळीप्रमाणे आणि स्नायूंनी बनलेली



असते. अन्न पुढे ढकलण्यासाठी हे स्नायू सतत आकुंचन आणि प्रसरण पावत असतात. या प्रक्रियेला 'पेरिस्टॅलिसिस' (Peristalsis) म्हणतात. जेव्हा पोटात अन्न असतं, तेव्हा हा आवाज आपल्याला ऐकू येत नाही. पण जेव्हा पोट रिकामं असते, तेव्हा या नळीमध्ये फक्त हवा आणि पाचक रस (Digestive Juices) उरलेले असतात. रिकाम्या नळीत ही हवा इकडून तिकडे हलली की त्याचा मोठा आवाज येतो.

याशिवाय जेव्हा पोट कित्येक तास रिकामे असते, तेव्हा मेंदू पचनसंस्थेला सिग्नल देतो की आता उरलेले अन्न किंवा द्रव साफ करण्याची वेळ आली आहे. याला 'मायग्रेटिंग मोटर कॉम्प्लेक्स' (MMC) म्हणतात. यावेळी होणाऱ्या जोरात आकुंचनामुळे पोटात असलेली हवा आणि थोडेफार द्रव पदार्थ इकडून तिकडे हलतात. पोटात उरलेलं अन्न, बॅक्टेरिया किंवा कचरा साफ करण्यासाठी स्नायू वेगाने हालचाल करू लागतात. याच हालचालीमुळे तो 'गुडगुड' आवाज येतो.

**आवाज येण्याची इतर कारणे**

केवळ भूकच नाही, तर इतर काही कारणांमुळेही पोटात असे आवाज येऊ शकतात. जसे की, घाईघाईत जेवताना किंवा पाणी पिताना जास्त हवा पोटात गेली तरी आवाज येतो. काही पदार्थ नीट न पचल्यामुळे आतड्यांमध्ये गॅस तयार होतो, ज्यामुळे आवाज वाढतो. पोटाचे विकार असतील तर आतड्यांची हालचाल वेगाने होते आणि आवाज येतो.

**हा आवाज थांबवण्यासाठी काय करावे?**

जर तुम्हाला हा आवाज वारंवार येत असेल तर काही उपाय करा. जसे की, कधीकधी फक्त पाणी पिल्याने पोटातील गॅस शांत होतो आणि आवाज कमी होतो.




**मेष** – कुटुंबाच्या सुखासाठी धावपळ करावी लागेल. कार्यक्षेत्रात सहकाऱ्यांची कमतरता जाणवेल. स्पर्धेत प्रगती होईल.

**वृषभ** - घरगुती वातावरण चांगले राहील. तणाव कमी होईल. नवीन परिचय उत्साहवर्धक ठरेल. आर्थिक प्रश्न सुटतील.

**मिथुन** – सामाजिक कार्यात रस वाढेल. घरातील कामे वेळेत पूर्ण करा. कठीण प्रसंगावर मात करण्याचा प्रयत्न कराल.

**कर्क** – तुमच्या ओळखीचा उपयोग येईल. आर्थिक समृद्धी आणि खर्चात वाढ होईल. कामात वरिष्ठांची मदत घ्याल.

**सिंह** – ठरवलेले काम पूर्ण कराल. कार्यक्षेत्रात अनेक संधी येतील. मर्यादेत काम करावे लागेल. रागावर नियंत्रण ठेवा.वरिष्ठांच्या सल्ल्याशिवाय पुढे जाऊ नका.

**कन्या** – कल्पनाशक्तीला संधी मिळेल. मान-सन्मान मिळेल. कामात यश मिळेल. कुटुंबातील सदस्यांची उणीव भासेल.

**तूळ** – सार्वजनिक क्षेत्रात प्रतिभा वाढेल. विपरीत परिस्थितीचा सामना करावा लागेल. आर्थिक समस्या कमी होतील.

**वृश्चिक** – नोकरीत प्रगतीची संधी सावधपणे घ्या. कामात समाधानी राहाल. मित्रांचे सहकार्य मिळेल. आरोग्य जपा.

**धनु** – नातलगांच्या भेटी होतील. घरामध्ये काही अडचणी येतील. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी राहाल.

**मकर** – व्यावहारिकतेकडे अधिक लक्ष द्या. गुंतवणूक करणे फायद्याचे ठरेल. धार्मिक कार्यात आपली रुची वाढेल.

**कुंभ** – वैवाहिक जीवनात सुसंवाद राहील. कामात व्यस्त असाल. सामाजिक कार्यात सहभागी व्हावे लागेल.

**मीन** – घरगुती वातावरण सुधारण्याचा आपण प्रयत्न कराल. नोकरीत आपल्या हातून कौतुकास्पद काम होईल. हाती घेतलेल्या कामाचा पाठपुरावा कराल. एखादी अडचण निर्माण होईल. गुंतवणुकीसाठी मार्ग सापडेल.